महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन उपक्रम)
सीआयएन: यु४०१०९एमएच२००५एसजीसी१५३६४५
वाणिज्य विभाग, प्लॉट क्र. जी-९, प्रकाशगड, प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१
संकेतस्थळ: www.mahadiscom.in, ई-मेल: cecommho@gmail.com

क्र.मु.अ.(वा)/वि.शु. प्रस्ताव/ No 07046 दिनांक: 28 FEB 2025

# वाणिज्य परिपत्रक क्र. ३४८

प्रति,
अधिक्षक अभियंता
सं व सु मंडळ कार्यालये, महावितरण,
छत्रपती संभाजी नगर (शहर), छत्रपती संभाजी नगर (ग्रामीण), जालना, लातूर, बीड, धाराशिव, नांदेड, परभणी, हिंगोली, अकोला, बुलढाणा, वाशीम, अमरावती, यवतमाळ, नागपूर (शहर), नागपूर (ग्रामीण), वर्धा, गोंदिया, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली.

**विषय:** विदर्भ व मराठवाडा विभागातील निर्मिती (Manufacturing) किंवा उत्पादन (Production) करण्याऱ्या औद्योगिक ग्राहकांना विद्युत शुल्क माफी क्षेत्रीय कार्यालयामार्फत देण्याबाबत स्पष्टतेसाठी सुधारित मार्गदर्शक सूचना.

**संदर्भ:**
१. महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम-१९५८
२. शासन निर्णय क्र. साप्रोयो-२१०९/(प्र.क्र.१४)/ उद्योग-८ दि.०२/०३/२००९
३. शासन निर्णय क्र. साप्रोयो-२०१४/(प्र.क्र.३)/उद्योग-८ दि.०६/०६/२०१४
४. महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम-२०१६ दि.०८/०८/२०१६
५. महाराष्ट्र शासन पत्र क्र. इएलडी-२०१७/प्र.क्र. २३९/ऊर्जा-१ दि.२८/१२/२०१७
६. पत्र क्र. पी-कॉम/लेखा/वि.शु. सूट व परतावा/०१११६७ दि.१७/०५/२०१८
७. शासन निर्णय क्र. साप्रोयो-२०१८/प्र.क्र.२५२/उद्योग-८ दि.२८/०५/२०१९
८. शासन अधिसूचना क्र. साप्रोयो-२०१८/प्रक्र-१५३/ऊर्जा-१ दि.०१/०८/२०१९
९. पत्र क्र.मु.अ.(वा)/वि.शु.माफी/१०४९३ दि.२८/०४/२०२२
१०. पत्र क्र.मु.अ.(वा)/वि.शु.प्रस्ताव/०१०२२१ दि.०६/०४/२०२३
११. शासन निर्णय क्र.साप्रोयो- २०२४/प्र.क्र.१३९/उद्योग-८ दि. ११/०७/२०२४
१२. शासन अधिसूचना क्र. PSI-२०२४/C.R.-१४१/Energy-१ दि. ११/०९/२०२४

**प्रस्तावना:**

विदर्भ व मराठवाडा विभागातील औद्योगिक उपक्रम जे उत्पादन किंवा निर्मिती या क्रियेमध्ये गुंतलेले आहेत, अशा ग्राहकांना विद्युत शुल्क माफी देण्याचा निर्णय शासनाकडून वेळोवेळी घेण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने शासन निर्णय क्र.साप्रयो-२०२४/प्र.क्र.१३९/उद्योग-८, दि.११/०७/२०२४ द्वारे विदर्भ व मराठवाडा या औद्योगिकदृष्ट्या अविकसित भागाचा औद्योगिक विकास व्हावा व या विभागातील उद्योग

स्पर्धात्मकदृष्ट्या सक्षम व्हावेत, या हेतुने विदर्भ व मराठवाड्यातील जिल्हयात अस्तित्वात असलेल्या व नव्याने स्थापित होणाऱ्या सर्व उद्योगांना दिली जाणारी विद्युत शुल्क माफीची सवलत दि.०१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२९ पर्यंत ५ वर्षासाठी वाढविण्यात आलेली आहे.

सदर निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक ती अधिसूचना ऊर्जा विभागाकडून No. PSI २०२४ C.R. १४१ Energy-१ dated ३०/०९/२०२४ निर्गमित करण्यात आली आहे व त्या संबंधीची अंमलबजावणी महावितरण तर्फे करण्यात आलेली आहे.

संदर्भीय विद्युत शुल्क माफीच्या शासन निर्णयानुसार, विदर्भ व मराठवाडा विभागातील उत्पादन अथवा निर्मिती करण्याऱ्या औद्योगिक ग्राहकांना प्रोत्साहन देण्यासंबंधी हा निर्णय घेण्यात आलेला आहे व पात्र वीज ग्राहकांना त्याच्या प्रथम वीज बिला पासूनच विद्युत शुल्क माफी मिळणे आवश्यक आहे. विद्युत शुल्क माफी ग्राहकास मिळणे बाबत महावितरण तर्फे विद्युत शुल्क माफीची कार्यवाही करण्यात येत आहे. तशा मार्गदर्शक सूचना क्षेत्रीय कार्यालयास वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आहेत.

तथापि, संदर्भ क्र. ९ च्या मुख्य कार्यालयाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार दक्षता घेण्याचे हेतूने, विद्युत शुल्क माफी प्रदान करण्याबाबत ग्राहक औद्योगिक उत्पादन करत आहे किंवा कसे याची विद्युत निरीक्षकांमार्फत फेरतपासणी करून घेणेबाबत निर्देशित केले होते. परंतु त्यामुळे उद्योजक वर्गाकडून याबाबत वेळोवेळी प्राप्त निवेदन आणि होणाऱ्या विलंबाच्या तक्रारीच्या अनुषंगाने सदर प्रक्रियेचे ग्राहकाभिमुख प्रशासनाचा दृष्टीकोण ठेवून संदर्भ क्रमांक १० अन्वये सुलभीकरण करण्यात आले होते.

परंतु, संदर्भ क्र.९ व १० अन्वये निर्गमित परिपत्रकांच्या अनुषंगाने काही मंडळ कार्यालयांकडून विद्युत निरीक्षक कार्यालय यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्यात येत होता. तसेच काही मंडळ कार्यालायांतर्फे शासनास अभिप्रेत असल्याप्रमाणे त्यांच्या स्तरावर विद्युत शुल्क आकारणी थांबवून थेट मुख्य कार्यालयाकडे परताव्याकरता प्रस्ताव पाठवण्यात येत होता.

त्यामुळे विदर्भ व मराठवाडा विभागातील ग्राहकांना विद्युत शुल्क माफी मंडळ कार्यालय स्तरावर देणे बाबत स्पष्टता नसल्याचे मुख्यालयाच्या निदर्शनास आले आहे. उपरोक्त बाबी विचारात घेऊन वीज ग्राहकांना शासनास अभिप्रेत असे धोरण राबवून संपूर्ण राज्यात पात्र ग्राहकांसाठी सुलभ व समान प्रक्रियेची अंमलबजावणी होणे आवश्यक असल्याचे जाणवते.

वरील महाराष्ट्र शासनाचे दि.२८/१२/२०१७ रोजीचे संदर्भ क्र.५ च्या पत्राद्वारे विद्युत शुल्क परतावा समितीची दि.१५/०९/२०१७ रोजीच्या बैठकीत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे.

> ***"विदर्भ व मराठवाडा विभागातील औद्योगिक उपक्रमांकडून वापरण्यात येत असलेल्या जागेच्या बाबतीत, त्या ठिकाणी वापरलेल्या विजेच्या वापरावरील विद्युत शुल्क भरण्यातून अधिसूचना क्र.: इएलडी-२०१४/प्र.क्र.२१३/ऊर्जा-१, दिनांक १४.०७.२०१४ अन्वये सूट देण्यात आलेली आहे. सदरची सूट दिनांक ३१.०३.२०१९ पर्यंत अनुज्ञेय आहे. त्यामुळे, विदर्भ व मराठवाडा विभागातील औद्योगिक उपक्रमांना असे प्रकल्प ज्या तारखेपासून अस्तित्वात येतील, त्या तारखेपासून विद्युत शुल्क माफी अनुज्ञेय करण्यात यावी तसेच, याबाबतची कार्यवाही महावितरण कंपनीने परस्पर करावी."***

वरील निर्देशानुसार विद्युत शुल्क माफीची कार्यवाही ही महावितरण कंपनीतर्फे त्यांच्या स्तरावरच करण्याचे निर्देशित आहे. यापूर्वी, वेळोवेळी वरील संदर्भित विविध पत्र व परिपत्रकांद्वारे विद्युत शुल्क सूट व

परतावा विषयी क्षेत्रीय कार्यालयांना कार्यपद्धती व मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आलेल्या असून त्यात एकसूत्रता आणि सुलभता आणण्याच्या दृष्टिकोनातून खालीलप्रमाणे निर्देशित करण्यात येत आहे.

**निर्देश / मार्गदर्शक सूचना :-**

**क. सध्याची कार्यपद्धती व अभिप्रेत / सुधारित कार्यपद्धती**

| अ.क्र | सध्याची कार्यपद्धती | अभिप्रेत / सुधारित कार्यपद्धती |
|---|---|---|
| १ | काही मंडळ कार्यालय ग्राहकास विद्युत शुल्क माफी देण्यासाठी विद्युत शुल्क माफीचा प्रस्ताव विद्युत निरीक्षक कार्यालय यांच्या कडे मंजुरीसाठी पाठवत होते. किंवा काही कार्यालये शासनास अभिप्रेत असल्याप्रमाणे मंडळ कार्यालय स्तरावरच औद्योगिक ग्राहक हा उत्पादन / निर्मिती मध्ये गुंतला आहे किंवा कसे याबाबत ची स्थळ-तपासणी करून सदर उद्योग उत्पादन किंवा निर्मिती मध्ये गुंतला असल्यास त्यांचे स्तरावरच विद्युत शुल्क माफी देणे बाबत कार्यवाही करतात. | • मंडळ कार्यालय स्तरावरच याबाबत औद्योगिक ग्राहक हा उत्पादन / निर्मिती उद्योग आहे किंवा कसे याबाबत ची स्थळ-तपासणी करून उत्पादन किंवा निर्मिती उद्योग असल्यास मंडळ कार्यालय स्तरावरच अधीक्षक अभियंता यांच्या मान्यतेने विद्युत शुल्क माफी देण्यात यावी.<br>• तसेच, ज्या ठिकाणी वीज दर संकेत जरी औद्योगिक आहे परंतु उत्पादन किंवा निर्मिती उद्योग नाही त्याठिकाणी विद्युत शुल्कात सूट देण्यात येवू नये उदा. : मोबाईल टावर, लाँड्री, कोल्ड स्टोरेज ईत्यादी.<br>• तसेच यापुढे प्रत्येक पात्र औद्योगिक ग्राहकास प्रथम वीज देयकापासूनच विद्युत शुल्क आकारला जाणार नाही याची दक्षता उच्चदाब ग्राहकासाठी अधीक्षक अभियंता व व्यवस्थापक (वित्त व लेखा) यांनी घ्यावी आणि लघुदाब ग्राहकांसाठी विभागीय कार्यकारी अभियंता व उप-व्यवस्थापक (वित्त व लेखा) यांनी घ्यावी. |
| २ | विद्युत शुल्क माफी व परतावा बाबत अर्ज असलेल्या प्रकरणामध्ये ग्राहकाकडून २०० /५०० रु चे स्टॅम्प पेपर वर क्षतिपूर्ती बंधपत्र घेण्यात येत आहे. | • विद्युत शुल्क माफी व परतावा बाबत क्षतिपूर्ती बंधपत्राएवजी या परिपत्रकासोबत जोडलेल्या मसुदयात ग्राहकाच्या लेटर हेडवर स्वयंघोषणा पत्र स्वीकारावे. सदर स्वयंघोषणा पत्र हे ग्राहकाने ऑनलाईन सादर केल्यास त्यास पुन्हा ऑफलाइन / हार्ड कॉपी ची मागणी करू नये. तसेच ऑनलाईन अर्जच Form F असल्याने तो पुन्हा वेगळा मागू नये. |
| ३ | उद्योगांचा वस्तूंचे उत्पादन / निर्मिती सुरु केल्याचा दिनांक निश्चित करण्यासाठी पूर्वी जिल्हा उद्योग नोंदणी प्रमाणपत्र, लघु उद्योग नोंदणी प्रमाणपत्र, उद्योग आधार, उद्यम नोंदणी प्रमाणपत्र यापैकी कोणताही एक कागद अभिप्रेत आहे. | • ग्राहकाकडून नवीन नियमाप्रमाणे केवळ उद्यम नोंदणी प्रमाणपत्र घ्यावे. उद्यम प्रमाणपत्रातील वस्तूंचे उत्पादन / निर्मिती सुरु केल्याचा नमूद दिनांक आणि नमूद पत्ता प्रमाणित करण्यासाठी हे आवश्यक आहे. |

**ख.** एखाद्या उत्पादन व निर्मिती करीत असलेल्या लघुदाब ग्राहकाचा विद्युत भार बदलामुळे जर उच्चदाब ग्राहकामध्ये परावर्तीत होत असेल किवा उच्चदाब ग्राहक हा लघुदाब मध्ये परिवर्तीत होत असेल व अश्या ग्राहकाचा ग्राहक क्रमांक बदलल्यास / न बदलल्यास व तद्नंतर देखील सदर ग्राहक उत्पादन किंवा निर्मिती करीत असल्याची खातरजमा झाल्यानंतर, ग्राहकाचे प्रथम वीज बिला पासूनच विद्युत शुल्क माफीसहित निर्गमित होईल हे सुनिश्चित करावे व याबाबतची जबाबदारी मंडळ कार्यालय यांची राहील.

**ग.** विद्युत शुल्क माफी व परतावा प्रकरणासाठी ग्राहकांचा उद्योग ज्या उपविभागांतर्गत आहे, त्या उपविभागातील लघुदाब वीज जोडणीसाठी उपविभागीय अधिकारी व उच्चदाब वीज जोडणीसाठी विभागीय कार्यकारी अभियंता यांनी ग्राहक हा उत्पादन किंवा निर्मिती करत असलेची खात्री करुन तसा स्थळ पाहणी अहवाल देणे आवश्यक आहे.

**घ.** ग्राहकाची विद्युत शुल्क परतावा करावयाच्या रक्कमेची ऑनलाईन B-८० ज्या कालावधीचा विद्युत शुल्क परतावा आहे, त्या कालावधीची B-८० जोडण्यात यावी व ती (मुळप्रत) लेखापरिक्षित केलेली असावी.

**ड.** सदर परिपत्रक निर्गमित होण्यापूर्वी उद्भवलेल्या परतावा प्रस्तावांना सुद्धा याच मार्गदर्शक सूचना लागू होतील.

**च.** वीज ग्राहकाचा विद्युत शुल्क परतावा अर्ज आल्यानंतर त्या अर्जाची छाननी करून प्रस्ताव योग्य असल्यास सदर प्रस्ताव अर्जाच्या दिनांकापासून कमाल १५ दिवसांत शिफारसीसह मुख्यकार्यालयास पाठवणे अनिवार्य राहील व त्रुटी असल्यास त्या एकत्र कळवाव्यात व या त्रुटींची पूर्तता करून पुन्हा १५ दिवसांचे आत परतावा प्रस्ताव पाठवणे बंधनकारक राहील. याबाबत ची सर्व जबाबदारी अधीक्षक अभियंता व व्यवस्थापक (वित्त व लेखा), मंडळ कार्यालय यांची राहील. तसेच सर्व त्रुटींची पूर्तता करून असा परिपूर्ण प्रस्ताव मुख्यकार्यालयास मंजुरीसाठी पाठविणे संबंधीतास बंधनकारक राहील.

**छ.** सबब, शासनाचे संदर्भ क्रमांक ५ च्या अनुषंगाने निर्गमित निर्देशानुसार विदर्भ व मराठवाडा विभागातील ***ग्राहकास विद्युत शुल्क माफी व परतावा देण्याची कार्यवाही महावितरण कंपनी तर्फे करणे अभिप्रेत आहे. म्हणून सदर प्रस्ताव हे शासनाच्या निर्देशानुसार विद्युत निरीक्षक यांच्या कडे मंजुरीसाठी पाठवण्याची आवश्यकता नाही. सदर माफी मंडळ कार्यालय स्तरावर देण्यात यावी तसेच विद्युत शुल्क परतावा प्रकरणे मुख्य अभियंता (वाणिज्य) यांच्याकडे पाठवावीत.***
***तसेच, नवीन परतावा प्रकरणे उदभवू नयेत यासाठी मंडळ कार्यालयांतर्गत संबंधित सर्व अधिकाऱ्यांना आवश्यक मार्गदर्शन व सूचना देण्याची जबाबदारी अधीक्षक अभियंता व व्यवस्थापक (वित्त व लेखा) यांची राहील.***

**ज.** यापुर्वी निर्गमित परिपत्रकात व या परिपत्रकात काही विसंगती आढळल्यास या परिपत्रकातील निर्देश / मजकूर ग्राह्य धरण्यात यावेत.

**झ.** **विद्युत शुल्क माफीची कार्यवाही महावितरण तर्फे केल्यानंतर** ***सदर विद्युत शुल्क माफी लागू करण्यात आलेल्या ग्राहकांची यादी संबंधित कागदपत्रांसह विद्युत निरीक्षक कार्यालयास दर महिन्यास माहितीकरता सादर करावी.***

सदर परिपत्रक केवळ, विदर्भ व मराठवाडा विभागातील औद्योगिक उपक्रम जे उत्पादन किंवा निर्मिती या क्रियेमध्ये गुंतलेले आहेत, अशा ग्राहकांना विद्युत शुल्क माफी देण्याविषयी शासनाची वरील संदर्भ क्र. १२ मधील अधिसूचना आहे त्या करताच लागू आहे. या अधिसूचनेत नमूद केल्याप्रमाणे विद्युत शुल्क माफीची सवलत दि.०१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२९ पर्यंत ५ वर्षासाठी आहे. शासनाच्या इतर सामुहिक प्रोत्साहन योजनांना सदर परिपत्रक लागू नाही.

ग्राहकांना योग्य व तत्पर सेवा देण्याच्या उद्देशाने वरील निर्देशांची अंमलबजावणी अत्यंत काटेकारेपणे तत्काळ करण्यात यावी.

सोबत: वरीलप्रमाणे

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**
**महावितरण**

**प्रत माहितीसाठी सस्नेह सादर:**

१. मा. सह सचिव (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिज विभाग,माध्यम मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
२. मुख्य विद्युत निरीक्षक, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, ३ रा माळा, नवीन प्रशासकीय इमारत, रामकृष्ण चेंबुरकर मार्ग, चेंबुर (पूर्व), मुंबई § ७१.
३. मा. संचालक (वाणिज्य), महावितरण
४. मा. कार्यकारी संचालक (वाणिज्य), महावितरण

**प्रत सस्नेह सादर:**

मुख्य अभियंता, परिमंडळ कार्यालय, महावितरण,
छत्रपती संभाजीनगर / लातूर / नांदेड / अकोला / अमरावती / नागपूर / गोंदिया / चंद्रपूर.

## मुख्य कार्यालयास विद्युत शुल्क परतावा प्रस्ताव पाठवण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची तपास-सूची

| अ. क्र. | तपशिल | तपासले |
|---|---|---|
| १ | ग्राहकाचा ऑनलाईन अर्ज F - Form ( अर्ज महावितरण कंपनीच्या ED refund portal वरील कार्यालयाच्याच लॉग-इन मधून संबंधित अधिकारी यांनी प्रिंट करावा ) | |
| २ | ग्राहकाच्या लेटर-हेड वरती विहित स्वरूपातील ऑनलाईन अपलोड केलेले स्वयं घोषणा पत्र. | |
| ३ | ग्राहकाचा उद्यम नोंदणी प्रमाणपत्र. | |
| ४ | उपविभागातील लघुदाब वीज जोडणीसाठी उपविभागीय अधिकारी व उच्चदाब वीज जोडणीसाठी विभागीय कार्यकारी अभियंता यांनी ग्राहक हा उत्पादन किंवा निर्मिती करत असलेची खात्री करून तसा स्थळ पाहणी अहवाल. | |

## स्वयं घोषणा पत्र

**( ग्राहकाच्या लेटरहेड वरती )**

मी / आम्ही ( प्रोपरायटर / भागीदार / अध्यक्ष / संचालक ) ______________________________

______________________________________________________________________________

ग्राहक क्रमांक ________________________________

ग्राहकाचे नाव ____________________________________________________

उद्यम नोंदणी क्र. ______________________________

पत्ता:____________________________________________________________

______________________________________________________________________________

प्रतिज्ञापुर्वक जाहीर करतो की, वरील परिसरात सदरील ( उत्पादनाचा तपशील ) ______________ ____________________________________उद्योग चालवीत आहोत आणि त्यासाठी, ______________ मंडळांतर्गत ______________ उपविभागीय कार्यालय, महावितरण च्यामार्फत विजजोडणी घेतली असुन त्याद्वारे वरील ठिकाणी विजेचा वापर करीत आहोत.

मी / आम्ही असे प्रमाणीत करतो की आमचे उपक्रमात विद्युत शुल्क माफीसाठी शासनास अभिप्रेत असल्याप्रमाणे औद्योगिक उत्पादन व निर्मिती क्रिया होते, त्यानुसार अर्जदार घटक हा विद्युत शुल्क सुट / परताव्यासाठी पात्र आहे.

मी / आम्ही, यापुर्वी वरील वीज जोडणी करता या कालावधीसाठी विद्युत शुल्क माफी / परतावा विषयी मागणी केलेली नव्हती तसेच मला अद्याप त्याबाबतचा तशा प्रकारचा कुठलाही लाभ वर नमुद केलेल्या वीज जोडणीसाठी वरील पत्त्यावर या अगोदर मिळालेला नाही.

तसेच आम्ही सादर केलेली कागदपत्रे योग्य असल्याचे मी प्रमाणित करतो व ती चुकीची वा अयोग्य आढळल्यास अथवा अनुज्ञेयता कालावधीत कोणत्याही कारणास्तव सुट अनुज्ञेय न ठरल्यास विद्युत शुल्क माफी / परताव्याचे आदेश रद्द करावेत व परताव्याची समायोजित केलेली रक्कम वसुल करण्यास माझी / आमची कोणतीही हरकत राहणार नाही. तसेच भविष्यात उत्पादन किंवा निर्मिती बंद झाल्यास अथवा काही बदल झाल्यास विद्युत शुल्क माफी बंद करण्यास मी आपल्या कार्यालयास स्वत:हून कळवेन. चुकीचे, खोटे अथवा बनवट कागदपत्रे सादर केल्यास प्रचलित कायदेशीर तरतुदीनुसार मी शिक्षेस पात्र राहील याची मला जाणीव आहे.

**स्थळ:**
**दिनांक:**

**अधिकृत व्यक्तीची स्वाक्षरी**
**अधिकृत व्यक्तीचे नाव, पदनामासह अस्थापनेचा शिक्का**

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४०

# मुंबई वीज शुल्क अधिनियम, १९५८

(दिनांक ३ नोव्हेंबर, २००६ पर्यंत सुधारलेला)

**BOMBAY ACT No. XL OF 1958**

# THE BOMBAY ELECTRICITY DUTY ACT, 1958

*(As modified upto 3rd November 2006)*

२००६

शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार, पुणे

[किंमत रु. ६/-]

# मुंबई वीज शुल्क अधिनियम, १९५८

## अनुक्रमणिका


उद्देशिका

| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ .. .. | १ |
| २. | व्याख्या .. .. | २ |
| ३. | वापरलेल्या ऊर्जेच्या युनिटांवरील शुल्क .. .. | ३ |
| ४. | वीज शुल्क भरणे .. .. | ५ |
| ४ क. | ऊर्जेच्या वापराची एखादी बाब अनुसूचीच्या कोणत्या भागात किंवा खंडात मोडते यासंबंधीचा प्रश्न उद्‌भवल्यास तो प्राधिकरणाकडे निर्देशित करणे. | ७ |
| ५. | लायसनदार इत्यादीने हिशेबाची पुस्तके ठेवणे व विवरणे सादर करणे | ७ |
| ५ क. | सूट देण्याचा अधिकार .. .. | ७ |
| ६. | निरीक्षण अधिकारी .. .. | ७ |
| ७. | निरीक्षकांचे अधिकार .. .. | ८ |
| ७ क. | अपील .. .. | ८ |
| ७ ख. | पुनरीक्षण .. .. | ८ |
| ८. | वसुली .. .. | ८ |
| ९. | शास्ती .. .. | ९ |
| १०. | कंपन्यांनी केलेले अपराध .. .. | ९ |
| ११. | सद्‌भावनापूर्वक केलेल्या कृतीबद्दल संरक्षण .. .. | ९ |
| १२. | नियम करण्याचा अधिकार .. .. | १० |
| १३. | व्यावृत्ती .. .. | १० |
| १४. | निरसने व व्यावृत्ती .. .. | ११ |
| १५. | आनुषंगिक .. .. | १२ |
| | अनुसूची .. .. | १२-१३ |

## सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४०[१]

(मुंबई वीज शुल्क अधिनियम, १९५८)

[ या अधिनियमास राज्यपाल यांची दिनांक ६ मे १९५८ रोजी अनुमती मिळाल्यानंतर तो **महाराष्ट्र शासन राजपत्र,** भाग चारमध्ये दिनांक ९ मे १९५८ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध करण्यात आला. ]

या अधिनियमाल पुढील अधिनियम, महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० या अन्वये अनुकूलन व सुधारणा करण्यात आल्या :—

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६.
सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८.
सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१.
सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८.
सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६.
सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५. *(१९-१०-१९७३) †
सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२. (१-४-१९७४) †
सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७४. (१-१-१९७६) †
सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८. (१-९-१९७८) †
सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४. ‡(१-९-१९७८) †
सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३. @(१-१०-१९८४) †
सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३. §(८-११-१९८५) †
सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९. (२२-४-१९८८) †
सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९.
सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१. (१-५-१९९८) †

मुंबई राज्यात विद्युत ऊर्जेच्या वापरावर शुल्क बसविण्यासाठी तरतूद करण्याबाबत अधिनियम.

**ज्याअर्थी,** मुंबई राज्यात विद्युत ऊर्जेच्या वापरावर शुल्क बसविण्यासाठी तरतूद करणे इष्ट आहे;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या नवव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, मुंबई वीज शुल्क अधिनियम, १९५८ असे म्हणावे.

(२) तो संपूर्ण [२][महाराष्ट्र राज्यास] लागू आहे.

(३) तो राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नेमील अशा दिनांकास अंमलात येईल.

---

[१] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी, **मुंबई शासन राजपत्र**, १९५८, असाधारण, भाग पाच, पृ. ४४(इंग्रजी) पहा.

[२] विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० द्वारे "मुंबई राज्यात" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

* विद्युत ऊर्जेच्या वापरातील शुल्क आकारणी आणि संकलन यांच्या विधिग्राह्यीकरणासाठी सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५ याचे कलम ५ पहा.

† ही खूण, अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

‡ सन १९७८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७ हा, सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४, कलम ३ (एक), द्वारे निरसित करण्यात आला.

@ सन १९८४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८ हा, सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम ५ द्वारे निरसित करण्यात आला.

§ सन १९८५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९ हा, सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम ८ द्वारे निरसित करण्यात आला.

व्याख्या. २. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,--

(क) ''उपभोक्ता'' या संज्ञेचा अर्थ, ज्या कोणत्याही व्यक्तीला, आकार (Charges) दिल्यावर किंवा अन्यथा लायसनदाराकडून किंवा जी विद्युत ऊर्जा निर्माण करते अशा इतर कोणत्याही व्यक्तीकडून, विद्युत ऊर्जा पुरविण्यात येते अशी व्यक्ती असा आहे; पण तीत [१][भारतीय विद्युत अधिनियम, १९१० याच्या अनुसूचीच्या खंड ९ च्या अर्थानुसार धाऊक लायसनदाराकडून किंवा] ज्यास विद्युत (पुरवठा) अधिनियम, १९४८ याचे कलम ५ या अन्वये रचना केलेल्या राज्य वीज मंडळाकडून विद्युत ऊर्जा पुरविण्यात येते अशा लायसनदाराचा समावेश होत नाही; आणि ''वापर करणे'' या संज्ञेचा, तिच्या व्याकरणिक फेरफारांसह तदनुसार अर्थ लावण्यात येईल; १९१० चा ९. १९४८ चा ५४.

[२][(कक) ''वापर आकार'' या संज्ञेचा अर्थ, उपभोक्त्याने वापरलेल्या ऊर्जेकरिता विद्युत (पुरवठा) अधिनियम, १९४८ अन्वये लायसनदाराने बसवलेला आकार असा आहे आणि त्यात ऊर्जा आकार, कमाल मागणी आकार, इंधन समायोजन आकार आणि इंधन खर्च समायोजन यांचा समावेश होतो;] १९४८ चा महा. ५४.

(ख) ''ऊर्जा'' या संज्ञेचा अर्थ, संदेश पाठविण्याच्या प्रयोजनाव्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रयोजनासाठी निर्माण केलेली, पारेषित केलेली, पुरविलेली किंवा वापरलेली विद्युत ऊर्जा असा आहे;

(ग) ''लायसनदार'' या संज्ञेचा अर्थ, भारतीय विद्युत अधिनियम, १९१०, भाग दोन अन्वये ऊर्जेचा पुरवठा करण्यासाठी जिला लायसन देण्यात आले आहे अशी कोणतीही व्यक्ती असा आहे व तीत जिने त्या अधिनियमाच्या कलम २८ अन्वये राज्य शासनाची मंजुरी मिळविली आहे अशा कोणत्याही व्यक्तीचा आणि [३][केंद्र शासन किंवा राज्य शासन विद्युत ऊर्जा पुरवण्याचा व्यवसाय करीत असेल तेव्हा, केंद्र किंवा राज्य शासनाचा] तसेच विद्युत (पुरवठा) अधिनियम, १९४८, कलम ५ अन्वये स्थापन केलेल्या राज्य वीज मंडळाचा समावेश होतो. १९१० चा ९. १९४८ चा ५४.

[४][(गक) ''नवीन औद्योगिक उपक्रम'' या संज्ञेचा अर्थ--

(एक) जो उपक्रम अगोदरच अस्तित्वात असलेल्या धंद्याचे विभाजन किंवा पुनर्रचना करून स्थापन करण्यात आला नसेल; किंवा

[५][(दोन) भारतात कोणत्याही प्रयोजनासाठी पूर्वी उपयोगात आणलेली कोणतीही यंत्रसामग्री किंवा संयंत्र अथवा त्याचा कोणताही भाग, नवीन धंद्याकडे हस्तांतरित करून जो नवा औद्योगिक उपक्रम स्थापन केलेला असेल असा उपक्रम जेव्हा प्रथमच वस्तूंची निर्मिती किंवा उत्पादन करू लागेल त्यावेळी अशा जुन्या यंत्रसामग्रीचे किंवा संयंत्राचे किंवा त्यांच्या भागाचे मूल्य त्या नवीन उपक्रमाच्या मालकीच्या यंत्रसामग्रीच्या किंवा संयंत्राच्या एकूण मूल्याच्या वीस टक्क्यांहून अधिक नसेल तर; आणि]

(तीन) मुंबई वीज शुल्क (सुधारणा) अधिनियम, १९६२ याच्या प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्यानंतर प्रथमतः किंवा अशा प्रारंभाच्या निकटपूर्वीच्या पाच वर्षांच्या कालावधीत कोणत्याही वेळी जो उपक्रम, वस्तूंची निर्मिती करण्यास किंवा उत्पादन करण्यास सुरुवात करील किंवा ज्या उपक्रमाने अशी सुरुवात केलेली असेल, असा कोणताही औद्योगिक उपक्रम असा आहे;] १९६२ चा महा. २६.

---

[१] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ याच्या कलम २ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम २ द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम २(१) द्वारे ''राज्य सरकार विद्युत शक्ती पुरवण्याचा धंदा करीत असेल तेव्हा, राज्य सरकारचा'' याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम २(२) द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[५] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम २ द्वारे मूळ उपखंडाऐवजी हा उपखंड दाखल करण्यात आला.

(घ) "विहित केलेले" या संज्ञेचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे.

३. (१) पोट-कलम (२) च्या तरतुदींना अधीन राहून [१][वापर आकार किंवा](उपभोक्त्यास पुरवठा करण्यापूर्वी लायसनदाराने पारेषण व परिवर्तन करताना वाया गेलेली ऊर्जा वगळून) ऊर्जेच्या जितक्या युनिटांचा वापर झाला असेल त्यावर या अधिनियमाच्या अनुसूचीमध्ये निर्दिष्ट केलेल्या दरांनी शुल्क (ज्याचा यात यानंतर "वीज शुल्क" असा निर्देश करण्यात आला आहे) बसवण्यात येईल व ते राज्य शासनाकडे भरण्यात येईल. वापरलेल्या ऊर्जेच्या युनिटांवरील शुल्क.

(२) [२][(क)] खालील बाबतीत [१][वापर आकार किंवा] वापरलेल्या ऊर्जेच्या युनिटांवर वीज शुल्क आकारता येणार नाही :--

[३][(एक) महाराष्ट्र शासनाने (निवासासाठी उपयोगात आणलेल्या जागांच्या बाबतीत वापरलेल्या विजेव्यतिरिक्त) वापरलेली ऊर्जा;

(एक-क) राज्यात त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्याअन्वये स्थापन केलेली कोणतीही महानगरपालिका, नगरपालिका, नगरपालिका समिती, नगर समिती, अधिसूचित क्षेत्र समिती, कटक मंडळ, जिल्हा परिषद किंवा ग्रामपंचायत यांच्याकडून किंवा त्यांच्या संबंधात अथवा [४][विद्याविषयक किंवा तांत्रिक विषयातील शिक्षण किंवा प्रशिक्षण देणारी शाळा किंवा महाविद्यालय, रुग्णालय, शुश्रूषागृह, दवाखाना, चिकित्सालय, सार्वजनिक रस्त्यांवरील दिवाबत्ती, सार्वजनिक पाणीपुरवठा व्यवस्था आणि सार्वजनिक गटारे किंवा जलनिस्सारण पद्धती (निवासी जागांच्या बाबतीत वापरलेल्या ऊर्जेव्यतिरिक्त)] यांच्यासंबंधात वापरलेली ऊर्जा;

(एक-ख) लायसनदारांच्या कोणत्याही वीज निर्मितीच्या, पारेषणाच्या आणि वितरणाच्या यंत्रणेचे बांधकाम, व्यवस्था आणि कार्यान्वयन यांच्याशी संबंधित असलेल्या प्रयोजनाकरिता लायसनदारानी वापरलेली ऊर्जा;]

(दोन) निवासी व कार्यालयीन प्रयोजनांसाठी असेल त्याव्यतिरिक्त ट्रामवे कंपनीने वापरलेली ऊर्जा;

[५][(तीन) कोणत्याही संविधिमान्य विद्यापीठाकडून किंवा विद्यापीठाच्या संबंधात आणि संविधिमान्य विद्यापीठाने चालवलेल्या परिसंस्थेकडून शिक्षण, संशोधन व प्रशिक्षण या प्रयोजनार्थ किंवा त्यांच्यासंबंधात (निवासी जागांच्या बाबतीत वापरलेल्या ऊर्जेव्यतिरिक्त) वापरलेली ऊर्जा;

१९५० चा मुंबई २९. (तीन-क) मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदणी केलेल्या धर्मादाय संस्थेकडून किंवा तिच्या बाबतीत विद्याविषयक किंवा तांत्रिक विषयामधील शिक्षण किंवा प्रशिक्षण देणाऱ्या शाळेच्या किंवा महाविद्यालयाच्या प्रयोजनासाठी किंवा त्यांच्या संबंधात (निवासी जागांच्या बाबतीत वापरलेल्या ऊर्जेव्यतिरिक्त) वापरलेली ऊर्जा;]

(चार) जेव्हा वाहने किंवा जलयाने यांच्या उपयोगासाठी पुरवठा करण्याच्या प्रयोजनाकरिता कोणत्याही व्यक्तीकडून ऊर्जेची निर्मिती करण्यात आली असेल तेव्हा वापरलेली ऊर्जा;

(पाच) १०० व्होल्टपेक्षा अधिक नसलेल्या व्होल्टतेने ऊर्जेची निर्मिती करण्यात आली असेल तेव्हा वापरलेली ऊर्जा;

---

[१] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ३ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६, याच्या कलम ३ द्वारे पोट-कलम (२) याला त्या पोट-कलमाचा खंड (क) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

[३] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, याच्या कलम ३ द्वारे मूळ उपखंडाऐवजी हे उपखंड दाखल करण्यात आले.

[४] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, याच्या कलम ३(१)(अ) द्वारे "सार्वजनिक रस्त्यावरील प्रकाश व्यवस्था, सार्वजनिक पाणीपुरवठा पद्धती किंवा सार्वजनिक गटारे किंवा जलनिःस्सारणाची पद्धती" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ३ (१) (ब) द्वारे उपखंड (तीन) ऐवजी हे खंड दाखल करण्यात आले.

(सहा) राज्य शासन त्या त्या क्षेत्रांतील औद्योगिक विकासाची व कृषि विकासाची गरज व परिस्थिती लक्षात घेऊन सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे यासंबंधात विनिर्दिष्ट करील अशा क्षेत्रात व अशा अटींना व शर्तींना अधीन राहून व अशा कालावधीसाठी (निवासी किंवा कार्यालयीन प्रयोजनांव्यतिरिक्त), अशा औद्योगिक किंवा कृषि प्रयोजनांच्या बाबतीत वापरलेली ऊर्जा;

[१][(सात) विदर्भ प्रदेशात, [२][मराठवाडा प्रदेशात, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये आणि ठाणे जिल्ह्यामध्ये (ठाणे-वसई खाडीने वेढलेला, बृहन्मुंबईला लागून असलेला भाग वगळून)] ज्या दिनांकास कोणत्याही नवीन औद्योगिक उपक्रमाने [३][महाराष्ट्र करविषयक कायदे (कर बसविणे व सुधारणा) अधिनियम, १९८८ याच्या प्रारंभापूर्वी प्रथमतःच वस्तूंची निर्मिती किंवा उत्पादन करण्यास सुरुवात केली असेल] त्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीत कोणत्याही औद्योगिक प्रयोजनाकरिता किंवा प्रक्रियेकरिता वापरलेली ऊर्जा :] १९८८ चा महा. ९.

[४][परंतु, 'मुंबई वीज शुल्क (सुधारणा) अधिनियम, १९८६' याच्या प्रारंभानंतर कोणत्याही दिनांकास (या उप-खंडात यानंतर जिचा 'उक्त दिनांक' असा निर्देश करण्यात आला आहे.) जो नवीन औद्योगिक उपक्रम, प्रथमच वस्तूंच्या निर्मितीस किंवा उत्पादनास सुरुवात करील, तो, उक्त दिनांकापासून दोन वर्षांच्या आत, विहित रीतीने व विहित नमुन्यात अर्ज करील; आणि त्यानंतर या उप-खंडाच्या तरतुदी उक्त दिनांकापासून अशा उपक्रमास लागू होतील :] १९८६ चा महा. १३.

[६][[५][परंतु आणखी असे की,] राज्य शासनास--राजपत्रातील अधिसूचनेद्वारे एक तर भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी प्रभावाने--

(क) पूर्वोक्त कोणतीही क्षेत्रे किंवा त्यांचा कोणताही भाग (त्यामध्ये अस्तित्वात असलेला ऊर्जेचा दर व त्या भागांची औद्योगिक विकासविषयक स्थिती लक्षात घेऊन), किंवा

(ख) कोणताही औद्योगिक उपक्रम [९][किंवा नवीन औद्योगिक उपक्रमाचा वर्ग] राज्य शासनास अशा अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करता येतील अशा [७][शर्ती आणि निर्बंध, यांना अधीन राहून]; वगळता येईल;

व त्यानंतर या [८][उप-खंडाच्या] तरतुदी त्या क्षेत्रांमध्ये किंवा त्यांच्या भागांमध्ये किंवा अशा नवीन औद्योगिक उपक्रमांच्या [९][किंवा नवीन औद्योगिक उपक्रमाच्या वर्गाच्या] संबंधात लागू होणार नाहीत.]

---

१ सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६, कलम ३(२) द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

२ सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम ३(१) (क) द्वारे "व हैद्राबाद क्षेत्रात" पासून "वसई खाडीने" पर्यंतच्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३ सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ५ (अ) द्वारे "उत्पादन करण्यास सुरुवात" या वाक्याने सुरु होणाऱ्या आणि "उरलेल्या कालावधीत" या वाक्याने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४ वरील अधिनियमाच्या कलम ५(ब) द्वारे "निर्मिती किंवा उत्पादन" या शब्दांनी सुरु होणाऱ्या आणि "उरलेल्या कालावधीत" या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५ सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम २(१) द्वारे हे परंतुक मूळ मजकुराऐवजी नेहमीकरिता घालण्यात आल्याचे मानण्यात आले आहे.

६ सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम ३(तीन)(क) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

७ वरील अधिनियमाच्या कलम ३(१)(क)(तीन)(ब) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

८ वरील अधिनियमाच्या कलम ३(१)(२)(अ) द्वारे "या खंडाच्या" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

९ वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे हे शब्द जादा दाखल करण्यात आले.

(ख) खंड (क) च्या [१][उपखंड] (सात) मध्ये राज्याचे जे भाग निर्दिष्ट करण्यात आलेले नाहीत त्या भागात (पण बृहन्मुंबई वगळून) कोणत्याही नवीन औद्योगिक उपक्रमाने कोणत्याही औद्योगिक प्रयोजनाकरिता किंवा प्रक्रियेकरिता वापरलेल्या ऊर्जेच्या युनिटांवर, ज्या दिनांकास अशा उपक्रमाने [२][महाराष्ट्र करविषयक कायदे (कर बसविणे व सुधारणा) अधिनियम, १९८८ च्या प्रारंभापूर्वी प्रथमत:च वस्तूंची निर्मिती किंवा उत्पादन करण्यास सुरुवात केली असेल] त्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीत या अधिनियमाच्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराच्या निम्म्या दराने वीज शुल्क आकारण्यात येईल:

१९८८ चा महा. ९.

[३][परंतु, ज्या नवीन औद्योगिक उपक्रमाने, मुंबई वीज शुल्क (सुधारणा) अधिनियम, १९८६ च्या प्रारंभानंतर कोणत्याही दिनांकाला (या उपखंडामध्ये यापुढे जिचा " उक्त दिनांक " असा निर्देश केला आहे) प्रथमतः वस्तूंची निर्मिती किंवा उत्पादन करण्यास सुरुवात केलेली असेल, त्या उपक्रमाने,विहित पद्धतीने आणि विहित नमुन्यात, उक्त दिनांकापासून दोन वर्षांच्या आत अर्ज केला पाहिजे; आणि त्यानंतर उक्त दिनांकापासून अशा उपक्रमाला या उपखंडातील तरतुदी लागू होतील :]

१९८६ चा महा. १३.

[४][[५][परंतु आणखी असे की,] राज्य शासनास राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, एकतर भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी प्रभावाने याबाबतीत अशा अधिसूचनेत राज्य शासनाकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल असे,—

(क) पूर्वोक्त कोणतेही क्षेत्र किंवा त्याचा कोणताही भाग (त्यामध्ये अस्तित्वात असलेला विजेचा दर व तत्संबंधीच्या औद्योगिक विकासासंबंधीची स्थिती लक्षात घेऊन), किंवा

(ख) असा कोणताही नवीन औद्योगिक उपक्रम [६][ किंवा नवीन औद्योगिक उपक्रमाचा वर्ग ] राज्य शासनाने अशा अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केल्या असतील [६][अशा शर्तींना व निर्बंधांना अधीन राहून] वगळता येईल;

व त्यानंतर या खंडाच्या तरतुदी त्या क्षेत्रामध्ये किंवा त्यांच्या भागात किंवा अशा नवीन औद्योगिक उपक्रमाच्या [७][किंवा नवीन औद्योगिक उपक्रमाच्या वर्गाच्या] संबंधात लागू होणार नाहीत.]

४. (१) प्रत्येक लायसनदार, त्याने उपभोक्त्यास [८][जितक्या वापर आकाराची] ऊर्जा पुरवली असेल, त्यावर या अधिनियमान्वये द्यावयाचे योग्य वीज शुल्क विहित केलेल्या वेळी व विहित पद्धतीने वसूल करून, ते शासनाकडे भरील. अशा रीतीने द्यावयाचे शुल्क लायसनदाराने पुरविलेल्या ऊर्जेबद्दल त्यास वसूल करण्याजोग्या असलेल्या रकमेवर प्रथम भार राहिल आणि ते त्याच्याकडून राज्य शासनाला देय असलेले कर्ज असल्याचे समजण्यात येईल : वीज शुल्क भरणे.

---

[१] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम ३(२) (अ) द्वारे "परिच्छेद" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ५(ब) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम ३ (२) (ब) अन्वये हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

[४] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम २ (२) द्वारे हे परंतुक मूळ मजकुराऐवजी नेहमीकरिता दाखल करण्यात आल्याचे मानण्यात आले.

[५] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम ३ (२) (एक) द्वारे 'परंतु' या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ३ (२) (क) (दोन) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[७] वरील अधिनियमाच्या कलम ३(२)(क)(तीन) द्वारे 'अशा नवीन औद्योगिक उपक्रमाच्या' या मजकुरानंतर हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[८] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम ४ द्वारे 'जितकी युनिटे' याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

परंतु, लायसनदारास त्याने पुरविलेल्या ऊर्जेबद्दल त्यास येणे असलेल्या रकमा वसूल करणे शक्य होत नसेल तर, तो अशा रीतीने पुरविलेल्या ऊर्जेबद्दल शुल्क देण्यास दायी असणार नाही.

(२) लायसनदार नसलेली व ऊर्जेची निर्मिती करणारी व अन्य कोणत्याही व्यक्तीला ती विनामूल्य पुरविणारी प्रत्येक व्यक्ती, त्या अन्य व्यक्तीने वापरलेल्या ऊर्जेच्या युनिटांवर या अधिनियमाअन्वये देय असलेले वीज शुल्क विहित वेळी व विहित पद्धतीने वसूल करील आणि त्याचा राज्य शासनाकडे भरणा करील.

(३) कोणत्याही व्यक्तीने [1][ तिला कोणत्याही वेळी पुरवण्यात आलेल्या किंवा तिने वापरलेल्या ऊर्जेवरील त्याने द्यायची असलेली] शुल्काची रक्कम विहित वेळी किंवा पद्धतीने भरण्यात कसूर केल्यास किंवा हयगय केल्यास लायसनदार, किंवा, यथास्थिति, ऊर्जा विनामूल्य पुरवणारी व्यक्ती [2][ कलम ८ अन्वये अशी रक्कम वसूल करण्यासंबंधीच्या राज्य शासनाच्या अधिकारास बाध न येता उपभोक्त्याने लायसनदाराकडे किंवा अशा व्यक्तीकडे कोणतीही अनामत रक्कम ठेवली असल्यास त्या रकमेतून वीज शुल्काची अशी रक्कम वसूल करील किंवा] अशा व्यक्तीला सात पूर्ण दिवसांपेक्षा कमी नसेल अशी लेखी नोटीस दिल्यानंतर, अशा व्यक्तीला करण्यात येणारा ऊर्जेचा पुरवठा तोडील; आणि ती त्या प्रयोजनासाठी, [3][ अशा व्यक्तीला पुरवण्यात आलेल्या किंवा तिने वापरलेल्या] ऊर्जेच्या संबंधात तिच्याकडून येणे असलेला कोणताही आकार किंवा रक्कम वसूल करण्यासाठी, भारतीय विद्युत अधिनियम, १९१० याच्या कलम २४, पोट-कलम (१) अन्वये लायसनदाराला देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करील. १९१० चा १०.

(४) अशा लायसनदाराला, किंवा, यथास्थिति, ऊर्जा विनामूल्य पुरविणाऱ्या व्यक्तीला, शुल्क गोळा करण्यासाठी तिने केलेला खर्च विचारात घेऊन राज्य शासन वेळोवेळी ठरवील अशा रकमेचा बटाव मिळण्याचा हक्क असेल.

(५) स्वतःच्या वापरासाठी ऊर्जेची निर्मिती करणाऱ्या लायसनदाराखेरीज अन्य प्रत्येक व्यक्ती, तिने वापर केलेल्या वीज ऊर्जेच्या युनिटांवर या अधिनियमान्वये देय असलेले योग्य वीज शुल्क विहित वेळेत आणि विहित पद्धतीने राज्य शासनाकडे भरील.

[4][ (६) या कलमाच्या पूर्वगामी पोट-कलमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणताही लायसनदार, ऊर्जा विनामूल्य पुरवणारी व्यक्ती किंवा स्वतःच्या वापरासाठी ऊर्जा निर्माण करीत असेल अशी व्यक्ती यांच्याकडून, योग्य वीज शुल्क देण्यात झालेली चूक ही, चुकीचे मीटर वाचन केल्यामुळे किंवा अनुसूचीच्या कोणत्याही विशिष्ट भागाखाली किंवा खंडाखाली येणाऱ्या वापराचे चुकीचे वर्गीकरण केल्यामुळे झालेली खरीखुरी चूक आहे याबाबत राज्य शासनाची खात्री झाल्यास, राज्य शासनाला कोणत्याही वेळी आदेशाद्वारे, योग्य दराने देय असलेल्या वीज शुल्काच्या किंवा त्याच्या कोणत्याही भागाच्या रकमेची आणि विलंबित प्रदानासाठी कलम ८ अन्वये देय असलेली व्याजाची रक्कम असल्यास, त्या व्याजाच्या रकमेची वसुली भूतलक्षी प्रभावाने सोडून देता येईल किंवा निर्लेखित करता येईल.] १८६० चा ४५.

---

[1] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७४ याच्या कलम २ (अ) अन्वये 'त्यास येणे असलेला' या मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ याच्या कलम ४ अन्वये, 'कलम ७ अन्वये, आणि' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७४ याच्या कलम २ (ब) अन्वये "त्याने पुरवलेल्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ याच्या कलम २ अन्वये पोट-कलम (६) जादा दाखल करण्यात आले.

[1][ ४क (१) या अधिनियमाच्या अनुसूचीतील कोणत्या भागाखाली किंवा खंडाखाली, ऊर्जेचा वापर अंतर्भूत केला जातो, याबाबत प्रश्न उपस्थित झाल्यास किंवा जेव्हा ऊर्जा विविध प्रयोजनांसाठी वापरली जाते, तेव्हा वापराच्या अशा कोणत्या हिश्श्याचे, अशा कोणत्या भागान्वये किंवा कोणत्या खंडान्वये नियमन केले जावे याबाबत प्रश्न उपस्थित झाल्यास, असा प्रश्न, राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे संपूर्ण राज्यासाठी किंवा राज्याच्या कोणत्याही भागासाठी विनिर्दिष्ट करील अशा प्राधिकरणाकडे निर्णयासाठी निर्देशित करण्यात येईल. प्राधिकरण, त्याला योग्य वाटेल अशा चौकशीनंतर, आपला निर्णय अभिलिखित करील.

ऊर्जेच्या वापराची एखादी बाब अनुसूचीच्या कोणत्या भागात किंवा खंडात मोडते यासंबंधीचा प्रश्न उद्भवल्यास तो प्राधिकरणाकडे निर्देशित करणे.

(२) पोट-कलम (१) खाली प्राधिकरणाने अभिलिखित केलेला निर्णय राज्य शासनाकडे कलम ७-क अनुसार करावयाच्या अपीलाला किंवा राज्य शासनाने कलम ७-ख अनुसार करावयाच्या पुनरीक्षणाला अधीन राहून अंतिम असेल.]

लायसनदार इत्यादींने हिशेबाची पुस्तके ठेवणे व विवरणे सादर करणे.

५. प्रत्येक लायसनदार आणि कलम ४, पोट-कलम (२) मध्ये नमूद केल्याप्रमाणे लायसनदार नसलेली जी व्यक्ती ऊर्जा विनामूल्य पुरवीत असेल अशी व्यक्ती आणि, तसेच, कलम ४, पोट-कलम (५) अन्वये वीज शुल्क देण्यास दायी असलेली प्रत्येक इतर व्यक्ती कलम ३, पोट-कलम (२) अन्वये तिला वीज शुल्क भरण्यातून सूट देण्यात आली नसेल तर, विहित केलेल्या नमुन्याप्रमाणे हिशेबाची पुस्तके ठेवील आणि राज्य शासनास किंवा विहित अधिकाऱ्यास विहित नमुन्यात व विहित केलेल्या वेळी सादर करील अशा विवरणात त्याने यथास्थिति, प्रत्येक उपभोक्त्याला पुरविलेल्या ऊर्जेची युनिटे किंवा त्याने वापरलेली ऊर्जेची युनिटे आणि त्यावर त्याने द्यावयाच्या शुल्काची रक्कम व कलम ४ अन्वये त्याने वसूल केलेली किंवा भरलेली शुल्काची रक्कम दर्शवण्यात येईल.

१९१० चा १०.

सूट देण्याचा अधिकार.

[2][५क. राज्य शासन लादील त्या शर्तींना अधीन राहून, सार्वजनिक हिताच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक आहे, असे राज्य शासनाला वाटल्यास, त्यास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे [3][मग ते भविष्यलक्षी प्रभावाने असो किंवा भूतलक्षी प्रभावाने असो,] कोणत्याही जागांच्या वर्गाच्या किंवा प्रयोजनांच्या वर्गाच्या संबंधात, किंवा विनिर्दिष्ट मर्यादेपर्यंत वापर झालेल्या ऊर्जेच्या संबंधात, संपूर्ण राज्यात किंवा त्याच्या कोणत्याही भागात ऊर्जेचा विनिर्दिष्ट मर्यादेपर्यंत जो काही वापर झाला असेल त्याबाबत या अधिनियमाच्या अनुसूचीचा भाग क [4][ भाग ख, [5][ भाग च किंवा भाग छ ] अन्वये द्यावयाचे संपूर्ण वीज शुल्क किंवा त्याचा कोणताही भाग याबद्दल सूट देता येईल.]

निरीक्षण अधिकारी.

६. (१) राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता, विहित केलेल्या अर्हता असणाऱ्या, त्यास योग्य वाटतील अशा कोणत्याही व्यक्तींची निरीक्षक म्हणून नेमणूक करील.

१८६० चा ४५.

(२) प्रत्येक निरीक्षक हा, भारतीय दंड संहिता, कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

---

[1] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम ४ अन्वये कलम ४-क समाविष्ट करण्यात आले.

[2] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम ४ अन्वये कलम ५-क समाविष्ट करण्यात आले.

[3] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम ३ अन्वये, १ ऑक्टोबर १९६२ पासून हा मजकूर नेहमीकरिता समाविष्ट करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

[4] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ६ अन्वये "भाग ख, भाग ङ, भाग च किंवा भाग ज" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ४ द्वारे "किंवा भाग च" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

निरीक्षकांचे अधिकार. ७. (१) राज्य शासनाने याबाबतीत केलेल्या कोणत्याही नियमांच्या तरतुदींना अधीन राहून, निरीक्षकास---

(एक) या अधिनियमान्वये आकारणीयोग्य असलेल्या वीज शुल्काच्या रकमेसंबंधी खातरजमा करून घेण्याकरिता किंवा तिची पडताळणी करण्याकरिता आवश्यक असलेली पुस्तके आणि अभिलेख तपासण्यासाठी सादर करण्यास भाग पाडता येईल;

(दोन) जेथे ऊर्जा पुरविण्यात येत असेल किंवा पुरविण्यात येत असल्याचे मानण्यात येत असेल अशा कोणत्याही जागेत---

(क) कलम ५ अन्वये ठेवलेल्या हिशेब पुस्तकात व सादर केलेल्या विवरणात केलेली निवेदने बरोबर आहेत किंवा नाहीत हे पडताळून पाहण्यासाठी,

(ख) मीटरवाचन बरोबर आहे किंवा नाही हे तपासण्यासाठी,

(ग) वीज शुल्क आकारणीच्या संबंधातील आवश्यक असलेला तपशील पडताळून पाहण्यासाठी; प्रवेश करता येईल व झडती घेता येईल.

(तीन) या अधिनियमाची किंवा तदन्वये केलेल्या नियमांची प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक असतील अशा इतर अधिकारांचा वापर करता येईल व अशी इतर कर्तव्ये पार पाडता येतील.

(२) पोट-कलम (१) अन्वये घेतलेल्या सर्व झडत्या, [१][ फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३]. च्या तरतुदींनुसार घेण्यात येतील. १९७४ चा २.

अपील. [२][**७क.** कलम ४क च्या पोट-कलम (१) खालील, प्राधिकरणाच्या निर्णयाविरुद्धचे अपील, राज्य शासनाकडे करता येईल व असे अपील त्या निर्णयाच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत करण्यात येईल.

पुनरीक्षण. **७ख.** कलम ७क खाली कोणतेही अपील करण्यात आले नसेल तर, राज्य शासनास, प्राधिकरणाच्या, कलम ४क च्या पोट-कलम (१) खालील निर्णयाच्या कायदेशीरपणाबाबत किंवा औचित्याबाबत आपली खात्री करून घेण्याच्या प्रयोजनार्थ, स्वतः होऊन कोणत्याही वेळी, प्रकरणाचा अभिलेख मागविता येईल व तपासून पाहता येईल. जर अशा प्रकारे मागवलेल्या कोणत्याही निर्णयामध्ये फेरबदल करावा, तो रद्द करावा किंवा फिरवावा असे राज्य शासनाला वाटले तर, त्या निर्णयामुळे बाधित झालेल्या व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, राज्य शासनास, त्यास योग्य वाटेल असा आदेश त्यावर देता येईल.]

वसुली. ८. [३][ वीज शुल्कापोटी येणे असलेली कोणतीही रक्कम, विहित केलेल्या पद्धतीने आणि त्यावेळी भरली गेली नाही तर, ती थकबाकी म्हणून समजण्यात येईल आणि त्यानंतर, अशा रकमेवर, अशी रक्कम देय झाल्यानंतर, लगतनंतरच्या पहिल्या तीन महिन्यांसाठी दरसाल दर शेकडा १७ टक्के दराने आणि त्यानंतर अशा रकमेचा भरणा केला जाईपर्यंत दरसाल दरशेकडा २४ टक्के दराने व्याज देय होईल;] आणि ती रक्कम व त्यावरील व्याज असल्यास ते व्याज---

(क) ती रक्कम, कलम ४, पोट-कलम (१) अन्वये देय असल्यास एक तर उपभोक्त्याकडून किंवा उक्त पोट-कलमाच्या परंतुकाला अधीन राहून, राज्य शासनाच्या [४][ किंवा राज्य शासनाने त्याबाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यांच्या] विकल्पाधिकाराप्रमाणे, लायसनदाराकडून,

---

[१] सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३ याच्या कलम ३ अन्वये "फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम ६ अन्वये मूळ कलम ७ च्या नंतर कलमे ७क व ७ख समाविष्ट करण्यात आली.

[३] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७४ याच्या कलम ३ अन्वये "वीज शुल्काबद्दल" या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि "रकमेवर द्यावे लागेल" या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ याच्या कलम ६ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(ख) ती रक्कम, कलम ४, पोट-कलम (२) अन्वये देय असल्यास, एक तर उपभोक्त्याकडून किंवा राज्य शासनाच्या [१][ किंवा राज्य शासनाने त्याबाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या] विकल्पाधिकाराप्रमाणे ऊर्जेचा विनामूल्य पुरवठा करणाऱ्या व्यक्तीकडून,

(ग) ती रक्कम, कलम ४, पोट-कलम (५) अन्वये, स्वतःच्या वापरासाठी ऊर्जेचे उत्पादन करणाऱ्या व्यक्तीकडून,

दिवाणी न्यायालयामार्फत किंवा जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यायोग्य असेल.

शास्ती.

९. जर एखादी व्यक्ती--

(क) कलम ५ च्या तरतुदीनुसार व कलम १२ अन्वये त्याबाबत केलेल्या नियमांनुसार हिशेबपुस्तके ठेवण्यात किंवा विवरणे सादर करण्यात कसूर करील, किंवा

[२][(क-एक) या अधिनियमाखाली केलेल्या कोणत्याही नियमाचे उल्लंघन करील, किंवा ]

(ख) निरीक्षक या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये त्याच्याकडे निहित केलेल्या अधिकारांचा वापर करीत असताना, त्याला जाणूनबुजून अडथळा करील,

तर तिला, सिद्धापराध ठरविण्यात आले असता [३][ एक हजार रुपयांपर्यंत ] असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

कंपन्यांनी केलेले अपराध.

१०. (१) या अधिनियमाखालील अपराध एखाद्या कंपनीने केल्यास, तो अपराध घडला त्यावेळी कंपनी ज्या व्यक्तीच्या स्वाधीन होती व कंपनीचे कामकाज चालवण्यास जी कंपनीला जबाबदार होती अशी प्रत्येक व्यक्ती व तसेच ती कंपनी, ही त्या अपराधाबद्दल दोषी आहे, असे समजण्यात येईल व त्याप्रमाणे त्यांच्याविरुद्ध खटला भरला जाण्यास व शिक्षा दिली जाण्यास त्या पात्र असतील :

परंतु, जर अशा कोणत्याही व्यक्तीने तो अपराध तिच्या नकळत घडला किंवा असा अपराध घडू नये म्हणून आपण योग्य ती सर्व दक्षता घेतली होती, असे सिद्ध केल्यास, या पोट-कलमातील कोणत्याही मजकुरामुळे या अधिनियमात तरतूद करण्यात आलेल्या कोणत्याही शिक्षेस ती पात्र ठरणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखालील अपराध एखाद्या कंपनीने केला असेल व तो अपराध कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारी याच्या मौन संमतीने किंवा त्याने दुर्लक्ष केल्यामुळे किंवा त्याने हयगय केल्यामुळे घडला आहे असे सिद्ध झाल्यास, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारी हादेखील त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार तो, त्याच्या विरुद्ध खटला भरला जाण्यास व शिक्षा दिली जाण्यास पात्र होईल.

**स्पष्टीकरण.**---या कलमाच्या प्रयोजनाकरिता---

(क) "कंपनी" या संज्ञेचा अर्थ निगम निकाय असा असून तीत भागीदारी संस्थेचा किंवा व्यक्तींच्या इतर संघाचा समावेश होतो; आणि

(ख) एखाद्या भागीदारी संस्थेच्या संबंधात "संचालक" या संज्ञेचा अर्थ त्या भागीदारी संस्थेतील भागीदार असा आहे.

सद्भावनापूर्वक केलेल्या कृतीबद्दल संरक्षण.

११. या अधिनियमान्वये सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही कृतीबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कारवाई दाखल करता येणार नाही.

---

[१] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ याच्या कलम ६ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ७(अ) अन्वये पोट-कलम (क-एक) जादा दाखल करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ७(ब) अन्वये "पन्नास रुपयांपर्यंत" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

याचा कार. १२. (१) राज्य शासनाला या अधिनियमातील तरतुदी अमलात आणण्यासाठी अधिनियमातील तरतुदींशी विसंगत नसतील असे नियम करता येतील.

(२) विशेषतः व वरील अधिकाराच्या सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता, अशा नियमाद्वारे पुढील गोष्टी करता येतील :--

(क) कलम ४ अन्वये वीज शुल्क भरण्याची वेळ व रीत विहित करणे;

(ख) कलम ५ अन्वये, हिशेबाची पुस्तके ठेवावयाचा नमुना आणि विवरणे कोणत्या वेळी, कोणत्या नमुन्यात व कोणत्या अधिकाऱ्यांना सादर करावयाची ते विहित करणे;

(ग) कलम ६ अन्वये, निरीक्षकांच्या अर्हता विहित करणे;

(घ) निरीक्षकास ज्या नियमांस अधीन राहून कलम ७ खालील, अधिकारांचा वापर करता येईल असे कोणतेही नियम असल्यास ते विहित करणे;

[१][(ङ) मीटर व सब-मीटर बसविणे व मीटर वाचणे यासंबंधी तरतूद करणे;

(च) या अधिनियमान्वये कोणतीही सवलत किंवा सूट मिळविण्यासाठी कार्यपद्धती विहित करणे;

(छ) या अधिनियमान्वये कोणत्याही कागदपत्रांच्या प्रती पुरविण्यासाठी फी आकारण्यासंबंधी तरतूद करणे;

(ज) अनुसूचीच्या परिच्छेद २ अन्वये निर्णयासाठी प्रश्न प्राधिकरणाकडे पाठविण्याची आणि अशा प्राधिकरणाच्या निर्णयाविरुद्ध राज्य शासनाकडे अपील करण्याची कार्यपद्धती विहित करणे.]

[२][(झ)] या अधिनियमाच्या तरतुदी अमलात आणण्यासाठी तरतूद करणे.

(३) या कलमान्वये नियम करणे हे पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीला अधीन असेल.

[३][(४) या कलमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल; आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरफार करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील तर, तो नियम अशा निर्णयाची अधिसूचना राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून केवळ अशा सुधारलेल्या स्वरूपातच अमलात येईल, किंवा यथास्थिति, तो नियम अमलात येणार नाही; तथापि, उक्त नियमात अशा रीतीने कोणतेही फेरफार केल्यामुळे किंवा तो नियम रद्द केल्यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे राहून गेलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.]

ती. १३. शंका निवारणासाठी, याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे जी वीज (मग ती शासनाने निर्माण केलेली असो किंवा इतर व्यक्तींनी केलेली असो)--

(क) भारत सरकारकडून वापरण्यात आली असेल किंवा भारत सरकारच्या वापरासाठी विकण्यात आली असेल, किंवा

---

[१] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम ८(अ) अन्वये खंड (ङ) ते (ज) समाविष्ट करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या खंड (ङ) ला खंड (झ) असे नवीन अक्षर देण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ८(ब) अन्वये पोट-कलम (४) समाविष्ट करण्यात आले.

(ख) भारत सरकारच्या कोणताही लोहमार्ग तयार करण्याच्या, तो सुस्थितीत राखण्याच्या किंवा त्याचे कार्य चालू ठेवण्याच्या कामी वापरण्यात आली असेल, किंवा कोणताही लोहमार्ग तयार करण्याच्या, तो सुस्थितीत राखण्याच्या किंवा त्याचे कार्य चालू ठेवण्याच्या कामी वापरण्यासाठी त्या शासनाला विकण्यात आली असेल,

अशा विजेच्या बापरावर किंवा विक्रीवर कर आकारला जातो किंवा आकारण्याचा प्राधिकार देण्यात येतो असे समजण्यात येणार नाही.

१४. या अधिनियमाचा प्रारंभ झाल्यावर पुढील तरतुदी निरसित होतील :-- निरसने व व्यावृत्ती.

१९३२ चा मुंबई २. (एक) मुंबई वित्त अधिनियम, १९३२ याचा भाग दोन;

१९४९ चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम १०. (दोन) मध्यप्रांत व वऱ्हाड विद्युत शुल्क अधिनियम, १९४९;

१९५६ चा सौराष्ट्र अधिनियम ८. (तीन) सौराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम, १९५६ :

परंतु, अशा निरसनामुळे पुढील बाबींस बाध येणार नाही :--

(क) अशा रीतीने निरसित केलेल्या कोणत्याही कायद्याचे पूर्वीचे प्रवर्तन किंवा त्यानुसार रीतसर केलेली किंवा सोसलेली कोणतीही कृती;

अथवा

(ख) अशा रीतीने निरसित केलेल्या कोणत्याही कायद्यानुसार संपादन केलेला, उपार्जित केलेला किंवा प्राप्त झालेला कोणताही हक्क, विशेषाधिकार, आबंधन किंवा दायित्व; किंवा

(ग) अशा रीतीने, निरसित केलेल्या कोणत्याही कायद्याविरुद्ध केलेल्या कोणत्याही अपराधाच्या संबंधात झालेली कोणतीही शास्ती किंवा शिक्षा; अथवा

(घ) पूर्वोक्त असा कोणताही हक्क, विशेषाधिकार, आबंधन किंवा दायित्व, शास्ती किंवा शिक्षा यांच्या संबंधातील कोणतेही अन्वेषण, कायदेशीर कारवाई किंवा उपाययोजना;

आणि असे कोणतेही अन्वेषण, कायदेशीर कारवाई किंवा उपाययोजना ही, जणू काही हा अधिनियम पारित झाला नव्हता असे समजून सुरू करता येईल, चालू ठेवता येईल किंवा तिची अंमलबजावणी करता येईल व अशी कोणतीही शास्ती किंवा शिक्षा करता येईल :

१९३२ चा मुंबई २. परंतु आणखी असे की, मागील परंतुकाला अधीन राहून, मुंबई वित्त अधिनियम, १९३२, भाग दोनच्या तरतुदींनुसार विहित केलेले शुल्काचे किंवा व्याजाचे दर किंवा तयार केलेले नियम किंवा नमुने आणि निरसित केलेल्या कोणत्याही तरतुदींनुसार केलेली निरीक्षकांची कोणतीही नेमणूक, या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींन्वये विहित केलेले दर किंवा तयार केलेले नियम किंवा नमुने आहेत किंवा केलेली नेमणूक आहे, असे मानण्यात येईल आणि या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही कृतीवरून किंवा उपाययोजनेवरून अधिक्रांत केल्याखेरीज व अधिक्रांत होईपर्यंत, त्याप्रमाणे अमलात असण्याचे चालू राहील.

षंगिक. १५. मुंबई वित्त अधिनियम, १९३२ मध्ये, दीर्घ शीर्षकातील "वीज ऊर्जेच्या वापरावर शुल्क बसविण्यासाठी तरतूद करण्याबाबत" आणि प्रस्तावनेतील "वीज ऊर्जेच्या वापरावर शुल्क बसविण्यासाठी तरतूद करणे" हे शब्द वगळण्यात येतील. १९३२ चा मुंबई २.

[1][अनुसूची

(कलम ३ पहा)

भाग क

| | |
|---|---|
| (एक) निवासी प्रयोजनासाठी वापरण्यात येणाऱ्या जागा;<br>(दोन) शैक्षणिक प्रयोजनासाठी वापरण्यात येणाऱ्या जागा;<br>(तीन) कोणत्याही इतर जागा, किंवा या अनुसूचीच्या इतर कोणत्याही भागांच्या कक्षेत न येणाऱ्या प्रयोजनासाठी करण्यात आलेला ऊर्जेचा वापर,<br>यांच्या बाबतीत. | राज्य शासन एकतर भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी प्रभावाने राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा वापर आकाराच्या २० टक्क्यांपेक्षा जास्त नसेल त्या दराने किंवा दरांनी. |

भाग ख

| | |
|---|---|
| (एक) धंद्यासाठी, व्यापारासाठी, वाणिज्यिक किंवा व्यावसायिक प्रयोजनासाठी वापरण्यात येणाऱ्या जागा;<br>(दोन) कलागृहासाठी (स्टुडिओ) वापरण्यात येणाऱ्या जागा;<br>(तीन) क्रीडा व सोशल क्लब यांसाठी वापरण्यात येणाऱ्या जागा;<br>(चार) रुग्णालय किंवा शुश्रूषालय किंवा दवाखाना किंवा चिकित्सालय;<br>(पाच) सार्वजनिक ठिकाणी किंवा जेथे जाहिरात केलेला किंवा प्रदर्शित केलेला माल किंवा सेवा विकण्यात येते, पुरविण्यात येते किंवा उपलब्ध करून देण्यात येते त्या जागेव्यतिरिक्त इतर जागेवर जाहिरात किंवा प्रदर्शन करण्याच्या प्रयोजनासाठी करण्यात आलेला वापर; आणि<br>(सहा) प्रदर्शने, करमणुकीचे कार्यक्रम किंवा सामाजिक समारंभ यांसाठी करण्यात येणारा तात्पुरता पुरवठा,<br>यांच्या बाबतीत. | राज्य शासन एकतर भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी प्रभावाने राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा, वापर आकाराच्या ३० टक्क्यांपेक्षा जास्त नसेल त्या दराने किंवा दरांनी. |

भाग ग

| | |
|---|---|
| चित्रपटगृहे, नाट्यगृहे, सर्कशी व लोकनाट्य यांसाठी केलेल्या कायम किंवा तात्पुरत्या स्वरूपाच्या पुरवठ्याच्या बाबतीत. | राज्य शासन एकतर भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी प्रभावाने राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील, अशा वापर आकाराच्या २५ टक्क्यांपेक्षा जास्त नसेल त्या दराने किंवा दरांनी.] |

भाग घ[2]

[2][सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९,क.७(३) द्वारे वगळला.]

भाग ङ[2]

[2][सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९,क.७(३) द्वारे वगळला.]

---

[1] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ५ द्वारे मूळ भाग क, भाग ख, व भाग ग ऐवजी हे भाग दाखल करण्यात आले.

[2] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम ७(३) द्वारे भाग घ व भाग ङ वगळण्यात आले.

### भाग च

| | |
|---|---|
| औद्योगिक उपक्रमासाठी वापरण्यात येत असलेल्या जागांच्या बाबतीत त्यामध्ये वापरलेल्या ऊर्जेसाठी (निवासी, वाणिज्यिक किंवा कार्यालयीन प्रयोजनासाठी वापरलेला त्याचा कोणताही भाग वगळून) [१][आणि कुक्कुटपालन किंवा उबवणी केंद्रे यांच्यासाठी वापर करण्याच्या बाबतीत.] | कोणत्याही क्षेत्रातील कोणत्याही वर्गाच्या औद्योगिक उपक्रमासाठी [१][आणि कुक्कुटपालन किंवा उबवणी केंद्रे यांच्यासाठी वापर करण्याच्या बाबतीत] वापरलेल्या जागेच्या बाबतीत, राज्य शासन एकतर भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी प्रभावाने राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे [२][वापर आकाराच्या १५ टक्क्यांपेक्षा] जास्त नसलेल्या दराने. |

### [३][भाग छ

| | |
|---|---|
| (क) लायसनदार नसलेली व ऊर्जेचे उत्पादन करणारी व ती ऊर्जा अन्य कोणत्याही व्यक्तीला त्या अन्य व्यक्तीच्या वापरासाठी विनामूल्य पुरविणारी प्रत्येक व्यक्ती;<br>(ख) लायसनदार नसून स्वतःच्या वापरासाठी ऊर्जेचे उत्पादन करणारी अन्य प्रत्येक व्यक्ती;<br>यांच्या बाबतीत. | राज्य शासन एकतर भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी प्रभावाने राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा, दर युनिटला ४० पैसे यापेक्षा जास्त नसेल त्या दराने किंवा दरांनी.] |

### [४][भाग ज

| | |
|---|---|
| (क) कृषिविषयक प्रयोगासाठी केलेल्या वापराच्या बाबतीत. | राज्य शासन एकतर भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी प्रभावाने राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा वापर आकाराच्या ३० टक्क्यांपेक्षा जास्त नसेल इतक्या दराने किंवा दरांनी.] |

---

१ सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम ७(४) द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

२ सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, याच्या कलम ५(ब) द्वारे "वीस पैशांपेक्षा" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३ वरील अधिनियमाच्या कलम ९(क) द्वारे हा भाग जादा दाखल करण्यात आला.

४ सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ५ द्वारे हा भाग जादा दाखल करण्यात आला.

विदर्भ व मराठवाडा विभागातील औद्योगिक
घटकांना विद्युत शुल्क माफी सवलतीचा
कालावधी वाढविणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

शासन निर्णय क्रमांकः साप्रोयो-२१०९/(प्र.क्र.१४)/उद्योग-८
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांकः- २ मार्च, २००९.

वाचाः- १) ऊर्जा विभागाची अधिसूचना क्र.इएलडी-१०९७/सीआर-२९९४/ऊर्जा-२, दि.१९ मार्च, १९९७.

२) ऊर्जा विभागाची अधिसूचना क्र.ईएलडी-१०९७/सीआर-९४८५/ऊर्जा-१, दि.२८ ऑगस्ट, १९९७.

३) शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांकः साप्रोयो- १००४/(प्र.क्र.९६)/ उद्योग-८, दि.२ जुलै, २००४.

४) ऊर्जा विभागाची अधिसूचना क्र.इएलडी-२००४/सीआर-२१३/ऊर्जा-१, दि.७ जुलै, २००४.

**शासन निर्णयः-**

संदर्भाधीन शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांकः साप्रोयो-१००४/(प्र.क्र.९६)/उद्योग-८,दि.२ जुलै,२००४ नुसार गडचिरोली /हिंगोली जिल्ह्यातील आणि मराठवाडा व विदर्भ विभागातील इतर जिल्ह्यातील उद्योगांना, ऊर्जा विभागाच्या दि.७/७/२००४ च्या अधिसूचनेद्वारे देय केलेली विद्युत शुल्क माफीची सवलत अनुक्रमे दि.३१/३/२०१२ व दि.३१/३/२००९ पर्यंत आहे. राज्याचा सर्वांगीण विकास होण्यासाठी, मराठवाडा व विदर्भ विभागाचा औद्योगिक विकास होणे आवश्यक असून तेथील उद्योगांना स्पर्धात्मक युगात टिकून राहण्याकरिता सक्षम करणे आवश्यक आहे.

२. ही बाब विचारात घेवून शासनाने असा निर्णय घेतला आहे की, विदर्भ व मराठवाड्यातील सर्व उद्योग घटकांना विद्युत शुल्क माफीची ही सवलत दि.३१/३/२०१४ पर्यंत वाढविण्यात यावी.

३. शासन निर्णयाच्या अमंलबाजावणीसाठी आवश्यक ती अधिसूचना ऊर्जा विभागाकडून तातडीने निर्गमित करण्यात येईल.

४. सदर शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संहिता क्रमांक २००९०३०२१६२२४५००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( दा.अं.कुलकर्णी )
शासनाचे अवर सचिव

प्रत:- १) विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई,
२) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
३) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
४) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, (ऊर्जा ), मंत्रालय, मुंबई
५) सर्व जिल्हा उद्योग केंद्रांचे महाव्यवस्थापक,
६) सर्व विभागीय आयुक्त,
७) सर्व जिल्हाधिकारी आणि उप उद्योग आयुक्त,
८) सर्व उद्योग सहसंचालक,
९) विक्रीकर आयुक्त, मुंबई

माहितीसाठी प्रत रवाना:-
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,
मा.मंत्री( उद्योग )यांचे खाजगी सचिव,
मा.उद्योग राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,
मा.मुख्यसचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय,
प्रधान सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय,
प्रधान सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय.
सचिव (ऊर्जा ) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय.

विदर्भ व मराठवाडा विभागातील औद्योगिक घटकांना विद्युत शुल्क माफी सवलतीचा कालावधी वाढविण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**

**उद्योग, उर्जा व कामगार विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः साप्रोयो-२०१४/(प्र.क्र.३)/उद्योग-८**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई-४०००३२.

तारीख: ६ जून, २०१४.

**वाचा —**

1) **शासन निर्णय क्रमांकः शासन निर्णय उ.ऊ.व का विभाग, क्र. साप्रोयो- २१०९/(प्र.क्र.१४) उद्योग-८, दि. २/३/२००९**

**शासन निर्णय—**

संदर्भाधीन शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र.साप्रोयो-२१०९/(प्र.क्र.१४)/उद्योग-८, दि.२ मार्च २००९ नुसार मराठवाडा व विदर्भ विभागातील सर्व उद्योगांना विद्युत शुल्क माफीची सवलत दि.३१/३/२०१४ पर्यंत आहे. राज्याचा सर्वांगीण विकास होण्यासाठी, मराठवाडा व विदर्भ विभागाचा औद्योगिक विकास होणे आवश्यक असून तेथील उद्योगांना स्पर्धात्मक युगात टिकून राहण्याकरिता सक्षम करणे आवश्यक आहे.

ही बाब विचारात घेवून शासनाने असा निर्णय घेतला आहे की, विदर्भ व मराठवाड्यातील सर्व उद्योग घटकांना विद्युत शुल्क माफीची ही सवलत पाच वर्षाकरीता म्हणजे दि.१/४/२०१४ ते ३१/३/२०१९ पर्यंत वाढविण्यात यावी.

सदर निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक ती अधिसूचना ऊर्जा विभागाकडून निर्गमित करण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०६०६११०४५३३९१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**दा.अं.कुलकर्णी**

शासनाचे अवर सचिव

प्रत,

१. विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई,
२. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
३. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
४. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, (ऊर्जा), मंत्रालय, मुंबई
५. सर्व जिल्हा उद्योग केंद्रांचे महाव्यवस्थापक,
६. सर्व विभागीय आयुक्त,
७. सर्व जिल्हाधिकारी आणि उप उद्योग आयुक्त,
८. सर्व उद्योग सहसंचालक,
९. विक्रीकर आयुक्त, मुंबई.

माहितीसाठी प्रत रवाना:-

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,
२. मा.मंत्री( उद्योग )यांचे खाजगी सचिव,
३. मा.उद्योग राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,
४. मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय,
५. अप्पर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय,
६. अप्पर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय.
७. प्रधान सचिव (ऊर्जा ) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय.

RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष २, अंक ३१ (२)] सोमवार, ऑगस्ट ८, २०१६/श्रावण १७, शके १९३८ [पृष्ठे १६, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ४२**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६.**—महाराष्ट्र राज्यातील विद्युत ऊर्जेच्या वापरावर शुल्क आकारण्याकरिता आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम . . . . | पृष्ठे १–१६ |

दिनांक ६ ऑगस्ट २०१६ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**नि. ज. जमादार,**
प्रधान सचिव व विधि परामर्शी,
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

## सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " महाराष्ट्र शासन राजपत्रात " दिनांक ८ ऑगस्ट २०१६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र राज्यातील विद्युत ऊर्जेच्या वापरावर शुल्क आकारण्याकरिता आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

२००३ चा ३६.
१९५८ चा ४०.

**ज्याअर्थी,** केंद्र सरकारने विद्युत अधिनियम, २००३ अधिनियमित केल्यामुळे, विद्युत निर्मिती, पारेषण व पुरवठा यांच्या व्यवस्थापनामध्ये, आमूलाग्र बदल घडून आले आहेत आणि विजेचा व्यापार, विजेची देवाण घेवाण, मुक्त प्रवेश, वीज निर्मितीचे लायसन रद्द करणे, इत्यादींसारख्या नवनवीन संकल्पना लागू करण्यात आल्या आहेत, ज्या यापूर्वी, महाराष्ट्र वीज शुल्क अधिनियमाच्या भाग नव्हत्या ;

**आणि, ज्याअर्थी,** उक्त विद्युत अधिनियमाद्वारे करण्यात आलेल्या बदलांचा विचार करून, उक्त विद्युत अधिनियमानुसार विद्युत ग्राहकांच्या सर्व प्रवर्गांना सामावून घेऊन महाराष्ट्र राज्यात विद्युत ऊर्जेच्या वापरावर शुल्क आकारण्यासाठी तरतूद करण्याकरिता विद्यमान महाराष्ट्र वीज शुल्क अधिनियम निरसित करून एक सर्वंकष कायदा करणे इष्ट आहे असे महाराष्ट्र शासनास वाटते ; **त्याअर्थी** भारतीय गणराज्याच्या सदुसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :— १९५८ चा ४०.

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम, २०१६ असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

व्याख्या.

**२.** (१) या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " स्व वीजनिर्मिती " याचा अर्थ, विद्युत अधिनियमाच्या कलम २ च्या खंड (८) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे, आणि केंद्र सरकारने याबाबतीत केलेल्या नियमांनुसार " स्व वीजनिर्मिती संयंत्रांमधून " निर्माण केलेली ऊर्जा, असा आहे ;

(ख) " सह वीजनिर्मिती " याचा अर्थ, ज्या प्रक्रियेत एकाच वेळी, विद्युत शक्तीसह दोन किंवा जास्त प्रकारच्या उपयुक्त ऊर्जा उत्पादित केल्या जातात अशा प्रक्रियेमध्ये निर्माण केलेली ऊर्जा, असा आहे ;

(ग) " आयोग " याचा अर्थ, राज्य शासनाने विद्युत अधिनियमाच्या कलम ८२ अन्वये घटित केलेला महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, असा आहे ;

(घ) " ग्राहक " याचा अर्थ, ज्या कोणत्याही व्यक्तीला लायसनधारकाकडून किंवा शासनाकडून किंवा विद्युत अधिनियमान्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये जनतेला विद्युत पुरवठा करण्याचा व्यवसाय करणाऱ्या इतर कोणत्याही व्यक्तीकडून, तिच्या स्वतःच्या वापरासाठी विद्युत पुरवठा करण्यात येतो अशी कोणतीही व्यक्ती, असा आहे, आणि तीत, जिची जागा त्या त्या वेळी वीज ग्रहण करण्याच्या प्रयोजनासाठी लायसनधारकाच्या, शासनाच्या, किंवा यथास्थिति, इतर कोणत्याही व्यक्तीच्या वीजविषयक कामांशी संबंधित असेल अशा कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो ;

(ङ) " वापर आकार " याचा अर्थ, ग्राहकाने वापरलेल्या ऊर्जेकरिता या अधिनियमान्वये, लायसनधारकाने आकारलेला आकार, असा आहे, आणि त्यात आयोगाने मान्यता दिलेल्या प्रशुल्कानुसार, नियत आकार जसे मागणी आकार, अनियत आकार, जसे ऊर्जा आकार, इंधन समायोजन आकार व सातत्यता आकार यांचा समावेश होतो, परंतु त्यामध्ये विलंब प्रदानाबाबत दंडनीय आकारांचा किंवा तात्काळ प्रदानाबाबत प्रोत्साहनांचा, वीज अंक, हार्मोनिक्स, भारांक, त्यावर आकारलेले व्याज आणि यथास्थिति निर्धारण केल्यानंतरचा प्रशमन आकार यांचा समावेश असणार नाही ;

(च) " विद्युत निरीक्षक " याचा अर्थ, विद्युत अधिनियमाच्या कलम १६२ च्या पोट-कलम (१) अन्वये राज्य शासनाने नियुक्त केलेली व्यक्ती, असा आहे ;

(छ) " विद्युत अधिनियम " याचा अर्थ, विद्युत अधिनियम, २००३ (२००३ चा ३६), असा आहे ;

(ज) " विद्युत शुल्क निरिक्षक " याचा अर्थ, राज्य शासनाने कलम ८ च्या पोट-कलम (१) अन्वये नियुक्त केलेली व्यक्ती, असा आहे ;

(झ) " ऊर्जा " याचा अर्थ, कोणत्याही प्रयोजनासाठी निर्माण केलेली, पारेषित केलेली, वितरित केलेली, वापरलेली, व्यापार केलेली किंवा चक्रीकरण केलेली विद्युत ऊर्जा, असा आहे ;

(ञ) " वीजनिर्मिती कंपनी " याचा अर्थ, जी, वीजनिर्मिती केंद्राची मालक आहे किंवा जी ते चालविते किंवा त्याची देखभाल करते अशी कोणतीही कंपनी किंवा निगम-निकाय किंवा संघ किंवा व्यक्तींचा संघ-मग तो विधिसंस्थापित असो किंवा नसो, किंवा विधिनिर्मित विधिमान्य व्यक्ती, असा आहे ;

(ट) "शासन" किंवा "राज्य शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(ठ) "स्वतंत्र वीज उत्पादक (आयपीपी)" याचा अर्थ, जो एक सार्वजनिक संस्था नाही परंतु जो, अनेक संस्था किंवा शेवटचे उपभोक्ते यांना विक्री करण्यासाठी विद्युत ऊर्जा उपलब्ध करून देतो असा विद्युत ऊर्जा उत्पादक, असा आहे ;

(ड) "उद्योग" याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाच्या त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कायद्यान्वये घोषित केलेला औद्योगिक उपक्रम, असा आहे, आणि त्यामध्ये, राज्य शासनाने वेळोवेळी घोषित केलेल्या विभिन्न औद्योगिक धोरणात समाविष्ट केलेल्या उद्योगांचा समावेश होतो ;

(ढ) "लायसनधारक" याचा अर्थ, जिला विद्युत अधिनियमाच्या कलम १४ अन्वये, विद्युत पारेषण, वितरण, पुरवठा, व्यापार करण्यासाठी लायसन दिलेले आहे अशी व्यक्ती, असा आहे आणि त्यामध्ये, जिने मानीव लायसनधारकाचा दर्जा धारण केला असेल व जिला विद्युत अधिनियमाच्या कलम १३ अन्वये सूट दिलेली आहे त्या व्यक्तींचाही समावेश होतो ;

(ण) "मुक्त प्रवेश" याचा अर्थ, आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या विनियमांनुसार, कोणत्याही लायसनधारकाने किंवा ग्राहकाने किंवा वीजनिर्मिती करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने पारेषण तारमार्गांचा किंवा वितरण व्यवस्थेचा किंवा असे तारमार्ग किंवा व्यवस्था यांच्या आनुषंगिक सुविधांचा वापर करण्यासाठी भेदभाव न ठेवणारी तरतूद, असा आहे ;

(त) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(थ) "नवीकरणीय ऊर्जा" याचा अर्थ, सूर्यप्रकाश, पवन, पाऊस, भरती, लाटा, भूगर्भीय उष्णता, बायोमास, जैव इंधन परंतु त्यात जीवाश्म इंधनाचा समावेश नाही, यांसारखे जे स्रोत पृथ्वीच्या नैसर्गिक पर्यावरणाचा भाग आहेत आणि जे एकतर जैविक पुनर्उत्पादनाद्वारे किंवा इतर नैसर्गिक पुनर्भरण प्रक्रियेद्वारे काळाच्या ओघात ऊर्जा पुन्हा भरून काढू शकतात अशा नवीकरणीय ऊर्जा स्रोतांमधून निर्माण केलेली ग्रिड दर्जाची विद्युतशक्ती, असा आहे ;

(द) "नवीकरणीय ऊर्जा स्रोत" याचा अर्थ, उसाची चिपाड किंवा शेतीचे टाकाऊ पदार्थ, जैव-इंधन, नगर किंवा महानगरातील घनकचरा, उद्योगातील टाकाऊ पदार्थ यांसह, लहान, सूक्ष्म व लघु जल, पवन, सौर, बायोमास यांसारखे नवीकरणीय स्रोत आणि भारत सरकारच्या नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाने मान्यता किंवा संमती दिलेले असे इतर स्रोत, असा आहे ;

(ध) "अनुसूची" याचा अर्थ, या अधिनियमासोबत जोडलेली अनुसूची, असा आहे ;

(न) "पर्यायी वीजनिर्मिती" याचा अर्थ, विद्युत अधिनियमाच्या कलम ५६ च्या तरतुदींनुसार आकार भरणा न केल्यामुळे वीजपुरवठा खंडित केल्याने नव्हे तर, बिघाड किंवा व्यत्यय किंवा भारनियमन, किंवा परिरक्षण, दुरुस्ती या कारणांमुळे विद्युत पुरवठाकाराने वीजपुरवठा खंडित केल्याने विद्यमान लायसनधारकाच्या वीजपुरवठ्याच्या अभावी केलेली वीजनिर्मिती, असा आहे ;

(य) "युनिट" याचा अर्थ, प्रति तास किलोवॅटमध्ये वापरलेल्या ऊर्जेचे मोजमाप करण्याचे युनिट, असा आहे.

२००३ चा ३६. (२) या अधिनियमात वापरलेले, परंतु यात व्याख्या न केलेले शब्द किंवा शब्दप्रयोग यांना विद्युत अधिनियम, २००३ अन्वये जे अर्थ नेमून दिलेले असतील तेच अर्थ असतील.

वापरलेल्या ऊर्जेच्या युनिटांवरील शुल्क.

**३.** (१) पोट-कलम (२) च्या तरतुदींच्या अधीन राहून, ज्या ग्राहकाच्या नावाने लायसनधारकाने ऊर्जेचा पुरवठा केला असेल अशा ग्राहकाकडून, किंवा जो ग्राहक अनुसूचित तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या आपल्या स्वतःच्या वापरासाठी लायसनधारकाकडून केल्या जाणाऱ्या विद्युतपुरवठ्याव्यतिरिक्त इतर स्वयंधारित (स्वतंत्र) स्रोताकडून उत्पादित करण्यात येणाऱ्या ऊर्जेचा वापर करीत असेल अशा ग्राहकाकडून होणाऱ्या परिवास्तूच्या वापराच्या आधारे, वेळोवेळी आयोगाच्या प्रशुल्क अनुसूचीनुसार वर्गीकृत केलेल्या दरांनी, वापर आकारावर किंवा

वापरलेल्या ऊर्जेच्या युनिटांवर, शुल्क (यात यापुढे ज्याचा निर्देश "विद्युत शुल्क" असा करण्यात आला आहे) आकारण्यात येईल व ते राज्य शासनाला प्रदान करण्यात येईल, असे विद्युत शुल्क हे पुढील वर्गीकरणावर आधारलेले असेल :—

(क) जेथे लायसनधारकाने ऊर्जेचा पुरवठा केला असेल तेथे, त्यासंबंधातील वापर आकार ;

**स्पष्टीकरण.—** या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ, "ज्याच्या नावाने ऊर्जा पुरवठा केला जातो त्या ग्राहकाकडून होणारा परिवास्तूचा वापर" याचा अर्थ, ज्या प्रयोजनासाठी ज्या ग्राहकाच्या नावाने, लायसनधारकाकडून विद्युत पुरवठा केला जातो व पुरवठा बिंदुप्रमाणे बसविलेल्या मीटरद्वारे त्याचे मापन केले जाते, ज्यावर प्रशुल्कानुसार वापर आकाराचे देयक पाठविले जाते, असे मूळ प्रयोजन, असा आहे, तथापि, मोठे औद्योगिक पार्क, वाणिज्यिक परिवास्तू किंवा मॉल्स यांमध्ये, जेथे एकल बिंदुवर किंवा बहुसंख्य ग्राहकांना विद्युत पुरवठा केला जातो आणि एक उपयुक्त सेवा म्हणून त्या परिवास्तूच्या मालकाकडून तो आणखी, पट्ट्याच्या किंवा भाड्याच्या किंवा इतर व्याप्तिक्षेत्राचा भोगवटा करणाऱ्या अंतिम उपभोक्त्यांना पुनर्वितरित केला जातो तेथे, अशा अंतिम उपभोक्त्याच्या विद्युत वापराचे प्रयोजन वर्गवारीनुसार वेगवेगळे असू शकेल.

(ख) एखाद्या व्यक्तीने वापरलेल्या ऊर्जेची युनिटे आणि पुढील स्रोतापासून निर्माण केलेली ऊर्जा–

(एक) स्व वीजनिर्मिती ;

(दोन) सह वीजनिर्मिती ;

(तीन) पर्यायी वीजनिर्मिती ;

(चार) नवीकरणीय ऊर्जा ;

(पाच) स्वतंत्र वीज उत्पादक (आयपीपी) ;

(ग) खंड (क) व (ख) खाली ज्यांचा समावेश केला नसेल अशा, म्हणजे मुक्त प्रवेश किंवा इतर स्रोत यातील वापरलेल्या उर्जेची युनिटे.

(२) पुढील घटकांसंबधातील, वापर आकारांवर किंवा त्यांच्याकडून म्हणजे,—

(एक) सार्वजनिक उपक्रम वगळता राज्य शासनाकडून ;

(दोन) सार्वजनिक उपक्रम वगळता केंद्र सरकारकडून ;

(तीन) महाराष्ट्र राज्यात त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याअन्वये स्थापन केलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांकडून चालविण्यात येणाऱ्या शाळा, महाविद्यालय किंवा शिक्षण किंवा प्रशिक्षण देणाऱ्या परिसंस्था, विद्यार्थी वसतिगृहे, रुग्णालये, शुश्रूषागृहे, दवाखाने, चिकित्सालये, सार्वजनिक रस्त्यांवरील दिवाबत्ती, सार्वजनिक पाणीपुरवठा व्यवस्था, सार्वजनिक जलनिस्सारण व्यवस्था, सार्वजनिक उद्याने, तसेच, प्राणी संग्रहालये, सार्वजनिक वस्तू संग्रहालये, व्यवस्थेची पूर्णतः किंवा यथास्थिति, अंशतः भाग असणारी प्रशासकीय कार्यालये यांच्या किंवा त्यांच्या संबंधातील प्रयोजनांकरिता ;

(चार) शासकीय वसतिगृहांकडून ;

(पाच) पारेषण आणि वितरण व्यवस्थेची संरचना, परिरक्षण, प्रवर्तन तसेच त्यातून पत्करलेली हानी यांच्याशी प्रत्यक्षपणे निगडित असलेल्या प्रयोजनांकरिता कोणत्याही लायसनधारकाकडून किंवा विद्युत अधिनियमान्वये जनतेला विद्युत पुरवठा करण्याचा व्यवसाय करणाऱ्या इतर कोणत्याही व्यक्तीकडून ;

(सहा) वीज निर्मिती संयंत्राची संरचना, परिरक्षण व प्रवर्तन यांच्याशी प्रत्यक्षपणे निगडित असणाऱ्या प्रयोजनांसाठी वीजनिर्मिती करणाऱ्या कोणत्याही कंपनीकडून ;

(सात) एखाद्या व्यक्तीकडून, मेट्रो रेल्वे व मोनोरेल वगळता वाहनांच्या किंवा जहाजांच्या वापराकरिता तिचा पुरवठा करण्याच्या प्रयोजनासाठी ऊर्जेची निर्मिती करण्यात येत असेल त्याबाबतीत ;

(आठ) १०० व्होल्टपेक्षा अधिक नसेल इतक्या व्होल्टेजची विद्युत निर्मिती करण्यात येत असेल त्याबाबतीत ;

वापरलेल्या ऊर्जेवर विद्युत शुल्क आकारण्यात येणार नाही.

(३) पोट-कलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, निवासी प्रयोजनांसाठी वापरल्या जाणाऱ्या परिवास्तूंच्या संबंधात अनुसूची क अनुसार वापर आकारावर विद्युत शुल्क आकारण्यात येईल आणि ते राज्य शासनाला प्रदान करण्यात येईल.

**वीज शुल्कात सूट देण्याचा अधिकार.**

४. राज्य शासन लादील अशा शर्तींना अधीन राहून, सार्वजनिक हिताच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक आहे असे राज्य शासनास वाटल्यास, त्यास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, संपूर्ण राज्यात किंवा त्याच्या कोणत्याही भागात, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा क्षेत्रातील आणि अशा कालावधीसाठी, कोणत्याही वर्गाच्या परिवास्तूंच्या किंवा प्रयोजनांच्या संबंधात ऊर्जेच्या वापरावर विद्युत शुल्क भरण्यापासून, किंवा विनिर्दिष्ट मर्यादेपर्यंत वापरलेल्या ऊर्जेच्या संबंधात,–

(एक) त्या क्षेत्रात असलेल्या ऊर्जेची उपलब्धता आणि त्या ऊर्जेची प्रचलित किंमत आणि औद्योगिक किंवा कृषि विकासाचा स्तर, शैक्षणिकस्तर, वैद्यकीय मदत, सुविधा, सामाजिक स्थिती ; आणि

(दोन) त्या क्षेत्रात या बाबतीत विनिर्दिष्ट केलेल्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे घोषित केलेली विविध धोरणे आणि गरजा आणि तेथील एकूण विकासाची स्थिती,

विचारात घेऊन, अनुसूचीनुसार देय असलेले संपूर्ण विद्युत शुल्क किंवा त्याचा कोणताही भाग भरण्यापासून, पूर्वलक्षी किंवा भूतलक्षी प्रभावाने, सूट देता येईल :

परंतु, या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे, या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी यासंबंधात काढलेल्या कोणत्याही आदेशावर परिणाम होणार नाही, आणि असा आदेश, त्यात नमूद करण्यात आलेला कालावधी समाप्त होईल तोपर्यंत, आणि असा कालावधी नमूद करण्यात आला नसेल त्या बाबतीत, या अधिनियमाच्या तरतुदींनुसार त्या संबंधात आणखी कोणताही आदेश काढण्यात येईल तोपर्यंत, अंमलात असणे चालू राहील.

**विद्युत शुल्काच्या दरात फेरबदल करण्याचा अधिकार.**

५. राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, त्यात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अटी व शर्तींना अधीन राहून, विनिर्दिष्ट केलेल्या अशा क्षेत्रांमध्ये आणि अशा कालावधीकरिता, अशा ग्राहकांच्या वर्गाच्या, अशा वीजनिर्मितीच्या प्रकाराच्या संबंधातील विद्युत शुल्काच्या दरात फेरबदल करता येतील.

**विद्युत शुल्काचे प्रदान व वसुली.**

६. (१) प्रत्येक लायसनधारक,–

(एक) कलम ३ च्या पोट-कलम (१) च्या खंड (क) अन्वये अनुसूची क प्रमाणे, वर्गीकरण केलेल्या ग्राहकांना, त्याने पुरवठा केलेल्या ऊर्जेच्या संबंधातील वापर आकारावर आधारित ;

(दोन) कलम ३ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ग) अन्वये अनुसूची ग प्रमाणे वर्गीकरण केलेल्या, आणि तसेच अनुसूची क मध्ये नमूद केलेल्या वितरण कंपनीच्या किंवा लायसनधारकाच्या वापर आकारांच्या प्रचलित दरांप्रमाणे, मुक्त प्रवेश सुविधेचा लाभ घेणाऱ्या ग्राहकांना चक्रणाद्वारे पुरवठा केलेल्या ऊर्जेच्या संबंधात वापरलेल्या ऊर्जेच्या युनिटांवर आधारित,

या अधिनियमान्वये देय असलेले उचित विद्युत शुल्क, विहित वेळी व विहित रीतीने वसूल करेल आणि राज्य शासनाला प्रदान करील.

(२) असे देय असलेले शुल्क हे, लायसनधारकाने पुरवठा किंवा चक्रण केलेल्या ऊर्जेबद्दल त्याच्याकडून वसुलीयोग्य असलेल्या रकमेवरील एक प्रथम भार असेल, आणि ते, त्याच्याकडून राज्य शासनाला देय असलेले एक ऋण असेल :

परंतु, लायसनधारक, त्याने पुरवठा किंवा चक्रण केलेल्या ऊर्जेबद्दल त्यास येणे असलेल्या रकमा वसूल करण्यास असमर्थ ठरला असेल त्याबाबतीत, तो, अशा पुरवठा केलेल्या ऊर्जेच्या संबंधातील शुल्क प्रदान करण्यास पात्र ठरणार नाही.

(३) जी व्यक्ती कलम ३ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ख) खाली येते, जी आपल्या स्वतःच्या वापरासाठी किंवा इतर कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तींना पुरवठा करण्यासाठी पूर्णत : किंवा अंशत : ऊर्जेचा वापर करते, अशी प्रत्येक व्यक्ती, अनुसूची ख प्रमाणे तिने किंवा ज्याला तिने ऊर्जेचा पुरवठा केला असेल अशा ग्राहकांनी वापरलेल्या ऊर्जेच्या संबंधात, या अधिनियमान्वये देय असलेले उचित विद्युत शुल्क, विहित वेळी व विहित रीतीने राज्य शासनाला प्रदान करील. जिला तिने ऊर्जेचा पुरवठा केला असेल अशा इतर व्यक्तीने किंवा व्यक्तींनी वापरलेल्या ऊर्जेवरील विद्युत शुल्काचा भाग तिला वसूल करता येईल.

(४) जी व्यक्ती लायसनधारक किंवा वीजनिर्मिती कंपनी नाही व जी कलम ३ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ग) खाली येते, जी आपल्या स्वतःच्या वापरासाठी किंवा इतर कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तींना पुरवठा करण्यासाठी पूर्णत : किंवा अंशतः ऊर्जेचा वापर करते, अशी प्रत्येक व्यक्ती, अनुसूची ग प्रमाणे तिने, किंवा ज्यांना तिने ऊर्जेचा पुरवठा केला असेल अशा ग्राहकांनी वापरलेल्या ऊर्जेच्या संबंधात, या अधिनियमान्वये देय असलेले उचित विद्युत शुल्क, विहित वेळी व विहित रीतीने लायसनधारकामार्फत राज्य शासनाला प्रदान करील. जिला तिने ऊर्जेचा पुरवठा केला असेल अशा इतर व्यक्तीने किंवा व्यक्तींनी वापरलेल्या ऊर्जेवरील विद्युत शुल्काचा भाग तिला वसूल करता येईल :

परंतु, पोट-कलम (३) किंवा पोट-कलम (४) खाली येणारी एखादी व्यक्ती, तिने इतर कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तींना पुरवठा केलेल्या ऊर्जेबद्दल तिला येणे असलेल्या रकमा वसूल करण्यास असमर्थ ठरली असेल त्या बाबतीत, ती, अशा पुरवठा केलेल्या ऊर्जेच्या संबंधातील शुल्क प्रदान करण्यास पात्र ठरेल.

(५) जर ऊर्जेचा पुरवठा लायसनधारकाला केला असेल तर, त्या बाबतीत, पोट-कलमे (३) व (४) यांमध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

(६) कोणतीही व्यक्ती, तिच्याकडून देय असलेल्या विद्युत शुल्काची रक्कम, विहित वेळेत आणि विहित रीतीने भरण्यात कसूर करील त्या बाबतीत, लायसनधारकास, किंवा यथास्थिति, ऊर्जेचा पुरवठा करणाऱ्या व्यक्तीस, कलम ११ अन्वये ती रक्कम वसूल करण्याच्या राज्य शासनाच्या अधिकारास बाध न येता, लायसनधारकाकडे किंवा ऊर्जेचा पुरवठा करणाऱ्या व्यक्तीकडे, ठेवीपोटी किंवा देय असलेल्या परताव्यापोटी कोणतीही रक्कम असल्यास, त्या रकमेमधून अशा विद्युत शुल्काची रक्कम कापून घेता येईल आणि जर अशी येणे असलेली रक्कम, लायसनधारकाकडे किंवा ऊर्जेचा पुरवठा करणाऱ्या व्यक्तीकडे असलेल्या ठेवीच्या किंवा परताव्याच्या रकमेतून वसूल होण्यासारखी नसेल तर, अशा ग्राहकाला किंवा व्यक्तीला पूर्ण सात दिवसांची लेखी नोटीस दिल्यानंतर, अशा ग्राहकाचा किंवा व्यक्तीचा ऊर्जेचा पुरवठा खंडित करता येईल; आणि लायसनधारकास, वापरलेल्या उर्जेवरील वापर आकाराच्या संबंधातील कोणताही आकार किंवा देय रक्कम वसूल करण्यासाठी, त्या प्रयोजनार्थ, विद्युत अधिनियमाच्या कलम ५६ च्या पोट-कलम (१) द्वारे त्याला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करता येईल.

(७) लायसनधारक, अशा लायसनधारकाने शुल्क वसूल करण्यासाठी केलेला खर्च विचारात घेऊन, राज्य शासनाकडून वेळोवेळी निर्धारित करण्यात येईल अशा रकमेइतकी, सूट मिळण्यास हक्कदार असेल.

(८) पूर्ववर्ती पोट-कलमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही लायसनधारकाकडून किंवा ग्राहकास ऊर्जेचा पुरवठा करणाऱ्या किंवा स्वतःच्या वापरासाठी ऊर्जेचा वापर करणाऱ्या व्यक्तीकडून चुकीचे मीटर वाचन केल्यामुळे किंवा अनुसूचीच्या कोणत्याही विशिष्ट भागाखाली किंवा खंडाखाली मोडणाऱ्या वापराचे चुकीचे वर्गीकरण केल्यामुळे उचित विद्युत शुल्क भरण्यात सद्भावमूलक चूक झाली असल्याबाबत राज्य शासनाची खात्री पटली असेल त्या बाबतीत, राज्य शासनास कोणत्याही वेळी, आदेशाद्वारे, विद्युत शुल्काच्या रकमेची, किंवा उचित दराने देय असलेल्या तिच्या कोणत्याही भागाची किंवा कलम ११ अन्वये विलंब प्रदानाबद्दल, कोणतीही देय असल्यास, त्याच्या व्याजाच्या रक्कमेची वसुली भूतलक्षी प्रभावाने माफ करता येईल किंवा ती निर्लेखित करता येईल.

लायसनधारक, इत्यादीने, लेखापुस्तके ठेवणे व विवरणे सादर करणे.

**७.** कलम ३ च्या पोट-कलम (१) खाली येणारा प्रत्येक लायसनधारक व ऊर्जेचा वापर करणारी प्रत्येक व्यक्ती, कलम (३) च्या पोट-कलम (२) अन्वये विद्युत शुल्कामधून ऊर्जेच्या संबंधात सूट दिली असेल ते खेरीज करून एरव्ही, विहित नमुन्यामध्ये लेखापुस्तक ठेवील आणि विहित करण्यात येतील अशा नमुन्यात व अशा वेळेत तिने वापरलेल्या, किंवा यथास्थिति, तिने प्रत्येक ग्राहकाला पुरवठा केलेल्या वीजेचे युनिट, आणि त्यावरील देय असलेल्या व कलम ६ अन्वये त्याने वसूल केलेल्या किंवा दिलेल्या विद्युत शुल्काची रक्कम दर्शविणारी विवरणपत्रे राज्य शासनास किंवा विहित केलेल्या अधिकाऱ्यास सादर करील.

विद्युत शुल्क निरीक्षकांची नियुक्ती.

**८.** (१) राज्य शासनाला, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता, विहित केलेल्या अर्हता असणाऱ्या, त्यास योग्य वाटतील अशा कोणत्याही व्यक्तीची विद्युत शुल्क निरीक्षक म्हणून नेमणूक करता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये नेमण्यात आलेले विद्युत शुल्क निरीक्षक हे विद्युत निरीक्षकाच्या नियंत्रणाखाली काम करतील.

(३) प्रत्येक विद्युत शुल्क निरीक्षक, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल. १८६० चा ४५.

९. (१) राज्य शासनाने या बाबतीत केलेल्या कोणत्याही नियमांच्या तरतुदींना अधीन राहून, विद्युत शुल्क निरीक्षकाला,— विद्युत शुल्क निरीक्षकांचे अधिकार.

(एक) या अधिनियमान्वये आकारणीयोग्य असलेल्या विद्युत शुल्काच्या रकमेची खातरजमा करून घेण्याकरिता किंवा पडताळणी करण्याकरिता आवश्यक असतील अशी पुस्तके आणि अभिलेख तपासणी करण्याकरिता सादर करण्यास फर्मावता येईल ;

(दोन) जेथे वीज पुरविण्यात येत असेल किंवा पुरविण्यात येत असल्याचे मानण्यात येत असेल अशा कोणत्याही परिवास्तूत,—

(क) कलम ७ अन्वये ठेवलेल्या लेखा पुस्तकांतील विवरणपत्रांची व सादर केलेल्या विवरणांची पडताळणी करण्यासाठी ;

(ख) मीटर तपासणी, वाचन करण्यासाठी आणि चाचणी घेण्यासाठी ;

(ग) विद्युत शुल्क आकारणीच्या संबंधातील आवश्यक असलेला तपशील पडताळून पाहण्यासाठी,

प्रवेश करता येईल व झडती घेता येईल ;

(तीन) या अधिनियमाची व त्याखाली केलेल्या नियमांची प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक असतील अशा इतर अधिकारांचा वापर करता येईल व अशी कर्तव्ये पार पाडता येतील.

१९७४ चा २. (२) पोट-कलम (१) अन्वये घेतलेल्या सर्व झडत्या, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या तरतुदीअनुसार घेण्यात येतील.

**१०.** (१) जेथे, ऊर्जेचा वापर या अधिनियमाच्या अनुसूचीतील कोणत्या भागाखालील किंवा खंडाखालील प्रवर्गांतर्गत मोडतो याबाबत किंवा जेथे विविध वापराच्या प्रयोजनांसाठी विजेचा वापर होतो तेव्हा वापराच्या कोणत्याही भागासाठी अशा भागान्वये किंवा खंडान्वये नियमन केले जावे याबाबत कोणताही प्रश्न उपस्थित झाला असेल तेथे, सदर प्रश्न, राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, संपूर्ण राज्यासाठी किंवा, राज्याच्या काही भागाकरिता, विनिर्दिष्ट करील अशा प्राधिकरणाकडे निर्णयार्थ पाठवील. सदर प्राधिकरण, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, आपला निर्णय लेखी नोंदवील. अपील प्राधिकरण.

(२) पोट-कलम (१) अन्वये प्राधिकरणाने नोंदविलेला निर्णय हा, पोट-कलम (३) अन्वये राज्य शासनाकडे केलेल्या कोणत्याही अपिलाच्या किंवा पोट-कलम (४) अन्वये केलेल्या पुनरीक्षणाच्या अधीन असेल आणि अशा अपिलाबाबतचा किंवा पुनरीक्षणाबाबतचा राज्य शासनाचा आदेश अंतिम राहील.

(३) पोट-कलम (१) अन्वये, प्राधिकरणाने दिलेल्या निर्णयाविरुद्धचे अपील, राज्य शासनाकडे दाखल करता येईल आणि असे अपील त्या निर्णयाच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत दाखल करण्यात येईल.

(४) जेथे पोट-कलम (३) अन्वये, कोणतेही अपील दाखल करण्यात आले नसेल तेव्हा, राज्य शासनाला, पोट-कलम (१) खालील प्राधिकरणाच्या निर्णयाची वैधता किंवा औचित्य याबद्दल स्वतःची खात्री करून घेण्यासाठी, स्वाधीकारे कोणत्याही वेळी सदर प्रकरणाचा अभिलेख मागविता येईल व त्याची तपासणी करता येईल. जर अशा प्रकारे मागविलेल्या कोणत्याही निर्णयामध्ये फेरबदल करावा, तो रद्द करावा किंवा फिरवावा असे राज्य शासनाला वाटत असेल तर, त्या निर्णयामुळे बाधित झालेल्या व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, राज्य शासनास, न्याय्य वाटत असेल असा आदेश त्यावर देता येईल.

**११.** (१) विद्युत शुल्कापोटी देय असलेली कोणतीही रक्कम, विहित केलेल्या वेळेत व रीतीने राज्य शासनाकडे चुकती केली नसेल तर, ती थकबाकी असल्याचे मानण्यात येईल, आणि त्यानंतर, अशा रकमेवर ती रक्कम देय असेल त्या लगतनंतरच्या पहिल्या तीन महिन्यांकरिता वार्षिक अठरा टक्के दराने व्याज देय असेल, आणि त्यानंतर अशी रक्कम चुकती करण्यात येईपर्यंत वार्षिक चोवीस टक्के इतक्या दराने व्याज देय होईल ; आणि ती रक्कम व त्यावरील व्याज, असल्यास, ते व्याज — शुल्क प्रदानास विलंब झाल्यास व्याज लागू होणे.

(एक) राज्य शासनाच्या किंवा या बाबतीत राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या विकल्पाधिकाराप्रमाणे, ती रक्कम, कलम ६ च्या पोट-कलम (१) अन्वये देय असेल तर एकतर ग्राहकाकडून किंवा उक्त कलम ६ च्या पोट-कलम (२) च्या परंतुकाच्या अधीन राहून, देय असेल तर, लायसनधारकाकडून ;

(दोन) राज्य शासनाच्या किंवा राज्य शासनाने या बाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या विकल्पाधिकाराप्रमाणे, ती रक्कम, कलम ६ च्या पोट-कलम (३) अन्वये देय असेल तर, एकतर ग्राहकाकडून किंवा ऊर्जेचा पुरवठा करणाऱ्या आणि आपल्या स्वतःच्या वापरासाठी किंवा यथास्थिति, अन्य व्यक्तीस वीज पुरवठा करण्यासाठी पूर्णतः किंवा अंशतः वापर करणाऱ्या व्यक्तीकडून,

एकतर दिवाणी न्यायालयामार्फत किंवा जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसुली योग्य असेल.

(२) कलम ६ च्या पोट-कलम (३) किंवा पोट-कलम (४) याखाली येणारे ग्राहक, किंवा यथास्थिति, लायसनधारक किंवा लायसनधारकाखेरीज अन्य व्यक्ती किंवा वीजनिर्मिती कंपनी ही, विद्युत शुल्क आणि व्याज देण्यास पात्र असेल, आणि तिने विद्युत शुल्क व व्याज यांच्या एकूण रकमेपेक्षा कमी रक्कम दिली असेल तर, अशा प्रकारे चुकत्या केलेल्या रकमेमधून प्रथम व्याजाची रक्कम, त्यानंतर कोणतीही शिल्लक रक्कम असल्यास, शास्तीची रक्कम आणि त्यानंतर कोणतीही शिल्लक रक्कम असल्यास विद्युत शुल्काची रक्कम समायोजित केली जाईल.

(३) राज्य शासनाला, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, विहित करण्यात येईल अशा परिस्थितीमध्ये, अशा अटी व शर्तीच्या अधीन आणि अशा कालावधीसाठी, या कलमान्वये व्याज किंवा शास्तीची संपूर्ण रक्कम किंवा काही भाग माफ करता येईल.

(४) राज्य शासनाला, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, जो ग्राहक या अधिनियमान्वये किंवा राज्य शासनाच्या विविध योजनांन्वये विद्युत शुल्क माफीसाठी पात्र आहे अशा ग्राहकाकडून वसूल केलेल्या विद्युत शुल्काची संपूर्ण रक्कम किंवा त्या रकमेचा कोणताही भाग परत करता येईल.

अपराध व शास्ती.

१२. (१) जर कोणतीही व्यक्ती —

(क) कलम ७ च्या तरतुदीनुसार व कलम १५ अन्वये त्याबाबत केलेल्या नियमानुसार लेखापुस्तके ठेवण्यास किंवा विवरणे सादर करण्यास कसूर करीत असेल ; किंवा

(ख) या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही नियमाचे उल्लंघन करीत असेल ; किंवा

(ग) या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये त्यास प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करणाऱ्या विद्युत शुल्क निरीक्षकाला जाणीवपूर्वक अडथळा आणीत असेल तर,

ती, दोषसिद्धीनंतर, दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल.

(२) पोट-कलम (१) खाली केलेल्या अपराधांच्या बाबतीत, कोणताही तक्रार अर्ज, तो अर्ज विद्युत निरीक्षकामार्फत दाखल करण्यात आला असल्याखेरीज विचारार्थ स्वीकारला जाणार नाही.

कंपन्यांनी केलेले अपराध.

१३. (१) या अधिनियमाखालील अपराध एखाद्या कंपनीने केला असेल तर, असा अपराध घडण्याच्यावेळी कंपनीचा प्रभार ज्या व्यक्तीकडे होता आणि कंपनीचे कामकाज चालविण्यास जी व्यक्ती कंपनीस जबाबदार होती, अशी प्रत्येक व्यक्ती, त्याचप्रमाणे ती कंपनी देखील, अशा अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानले जाईल आणि अशी व्यक्ती व कंपनी त्यांच्याविरूद्ध कार्यवाही केली जाण्यास व त्यानुसार शिक्षा दिली जाण्यास पात्र असतील :

परंतु, अशा कोणत्याही व्यक्तीने असा अपराध तिच्या नकळत घडला किंवा असा अपराध घडू नये म्हणून आपण योग्य ती दक्षता घेतली होती असे सिद्ध केले तर, या पोट-कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे ती व्यक्ती या अधिनियमात तरतूद केलेल्या कोणत्याही शिक्षेस पात्र होणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखालील अपराध एखाद्या कंपनीने केला असेल, आणि त्या कंपनीच्या कोणत्याही संचालकाच्या, व्यवस्थापकाच्या, सचिवाच्या किंवा अन्य अधिकाऱ्याच्या संमतीने किंवा मूक संमतीने किंवा त्याने दुर्लक्ष केल्यामुळे असा अपराध घडल्याचे सिद्ध करण्यात आले असेल तर, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा कंपनीचा अन्य अधिकारी देखील त्या अपराधाबद्दल दोषी आहे असे मानले जाईल व त्याच्याविरुद्ध कारवाई केली जाण्यास व त्यानुसार शिक्षा दिली जाण्यास तो पात्र होईल.

**स्पष्टीकरण**.—या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क) " कंपनी " याचा अर्थ, निगम निकाय, असा आहे व त्यात भागीदारी संस्थेचा, व्यक्तींच्या संघाचा अथवा व्यक्तींच्या संस्थेचा-मग ती विधिसंस्थापित असो वा नसो-समावेश होतो ;

(ख) *भागीदारी संस्थेच्या संदर्भात* " संचालक " याचा अर्थ, त्या भागीदारी संस्थेतील भागीदार, असा आहे आणि व्यक्तींचा संघ किंवा व्यक्तींची संस्था यांच्या संदर्भात " संचालक " याचा अर्थ तिच्या कामकाजाचे नियंत्रण करणारा कोणताही सदस्य, असा आहे.

सद्भावनेने केलेल्या कृतीस संरक्षण.

**१४.** या अधिनियमान्वये सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही कृतीबद्दल कोणत्याही व्यक्ती विरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा कायदेशीर कारवाई दाखल करता येणार नाही.

नियम करण्याचा अधिकार.

**१५.** (१) राज्य शासनाला, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याच्या प्रयोजनार्थ, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) विशेषतः व वरील अधिकाराच्या **सर्वसाधारणतेस** बाध न आणता, अशा नियमाद्वारे—

(क) पुढील बाबी, म्हणजे,—

(एक) विद्युत शुल्काच्या प्रदानाचा देय दिनांक ;

(दोन) हप्त्याने विद्युत शुल्क प्रदान करणे ;

(तीन) ज्या परिस्थितीत व ज्या शर्तींना अधीन राहून आणि ज्या कालावधीपर्यंत विद्युत शुल्क प्रदान करण्याचे लांबणीवर टाकण्यास कलम ६ अन्वये परवानगी देण्यात येईल ती परिस्थिती व त्या शर्ती व तो कालावधी,

यांकरिता विद्युत शुल्क प्रदानाची मुदत व रीत विहित करता येईल ;

(ख) अधिनियमान्वये कोणतीही सवलत किंवा सूट मिळवण्यासाठीची कार्यपद्धती विहित करणे ;

(ग) ज्या नमुन्यात लेखा पुस्तके ठेवावयाची तो नमुना, आणि ज्या कालावधीत, ज्या नमुन्यात व ज्या अधिकाऱ्याकडे कलम ७ द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे विवरणे सादर करण्यात येतील तो कालावधी, तो नमुना आणि ते अधिकारी विहित करणे ;

(घ) कलम ८ च्या पोट-कलम (१) खाली विद्युत शुल्क निरीक्षकांची अर्हता विहित करणे ;

(ङ) ज्या नियमांच्या अधीनतेने विद्युत शुल्क निरीक्षकांस कलम ९ च्या पोट-कलम (१) खालील अधिकारांचा वापर करता येईल असे नियम, कोणतेही असल्यास, ते विहित करणे ;

(च) मीटर बसवण्याची व त्याची तपासणी, वाचन आणि चाचणी करण्यासाठीची कार्यपद्धती विहित करणे ;

(छ) प्राधिकरणाकडे निर्णयासाठी प्रश्न पाठविण्यासाठीची आणि अशा प्राधिकरणाच्या निर्णयाच्या विरुद्ध राज्य शासनाकडे अपील दाखल करण्यासाठीची किंवा पुनरीक्षण करण्यासाठीची कार्यपद्धती विहित करणे ;

(ज) ग्राहकाने या अधिनियमान्वये देय असलेल्या विद्युत शुल्काच्या रकमेपेक्षा अधिक भरलेल्या रकमेच्या परताव्याची मागणी करण्यासाठीची कार्यपद्धती व कालमर्यादा विहित करणे ;

(झ) या अधिनियमान्वये कोणत्याही कागदपत्राच्या प्रती पुरविण्याबद्दलची फी विहित करणे ;

(ज) या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी तरतूद करणे.

(३) या कलमान्वये नियम करणे हे पूर्व प्रसिद्धीच्या शर्तीला अधीन असेल.

(४) या कलमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा अधिक अधिवेशनात एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल ; आणि ज्या अधिवेशनात तो अशा रितीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन किंवा अधिवेशने समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरफार करण्यास दोन्ही सभागृहे सहमत होतील किंवा नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे सहमत होतील तर, तो नियम अशा निर्णयाची अधिसूचना **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून केवळ अशा सुधारलेल्या स्वरूपातच अंमलात येईल, किंवा, यथास्थिति, तो नियम अंमलात येणार नाही ; तथापि, उक्त नियमात अशा रितीने कोणतेही फेरफार केल्यामुळे किंवा तो नियम रद्द केल्यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे राहून गेलेल्या कोणत्याही कृतींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

निरसन व व्यावृत्ती.

**१६.** नियत दिनांकास व तेव्हापासून, महाराष्ट्र वीज शुल्क अधिनियम हा निरसित होईल : १९५८ चा ४०.

परंतु, या निरसनाचा पुढील गोष्टींवर परिणाम होणार नाही,—

(क) अशाप्रकारे निरसित केलेल्या कायद्यान्वये केलेला कोणताही नियम किंवा काढलेली कोणतीही अधिसूचना, आदेश अथवा नोटीस यांनुसार करण्यात आलेली, किंवा करण्याचे किंवा हाती घेण्याचे अभिप्रेत असलेली कोणतीही गोष्ट किंवा कृती ; किंवा

(ख) अशाप्रकारे निरसित केलेल्या कायद्यान्वये केलेली कोणतीही नेमणूक, स्थायीकरण अथवा घोषणा किंवा देण्यात आलेले कोणतेही प्राधिकार पत्र अथवा सूट किंवा निष्पादित करण्यात आलेले कोणतेही कागदपत्र अथवा संलेख आणि देण्यात आलेला कोणताही निदेश ; किंवा

(ग) अशाप्रकारे निरसित केलेल्या कायद्यान्वये संपादित, उपार्जित केलेला अथवा पत्करलेला कोणताही अधिकार, विशेषाधिकार, आबंधन किंवा दायित्व ; किंवा

(घ) उपरोक्तप्रमाणे असा कोणताही अधिकार, विशेषाधिकार, आबंधन, दायित्व, शास्ती यांच्याबाबतीत केलेले कोणतेही अन्वेषण, कायदेशीर कारवाई अथवा उपाययोजना ; आणि जणू काही हा अधिनियम अधिनियमित झाला नव्हता असे समजून असे कोणतेही अन्वेषण, कायदेशीर कारवाई अथवा उपाययोजना ही, सुरू करता येईल, चालू ठेवता येईल अथवा तिची अंमलबजावणी करता येईल व अशी कोणतीही शास्ती करता येईल :

परंतु, आणखी असे की, पूर्ववर्ती परंतुकाच्या अधीनतेने, महाराष्ट्र वीज शुल्क अधिनियमाच्या तरतुदींअन्वये विहित करण्यात आलेल्या शुल्कांचे दर किंवा व्याज, तयार करण्यात आलेले नियम किंवा नमुने हे, तसेच निरसित तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदीअन्वये केलेली विद्युत शुल्क निरीक्षकांची कोणतीही नेमणूक ही, या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींन्वये विहित करण्यात, तयार करण्यात किंवा करण्यात आल्याचे मानण्यात येईल, आणि या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही कृतीद्वारे अथवा कोणत्याही कार्यवाहीद्वारे ते अधिक्रमित केल्याखेरीज व तोपर्यंत, त्यानुसार अंमलात असणे चालू राहील. १९५८ चा ४०.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**१७.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणत्याही अडचणी उद्‌भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरुप, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही कृती करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढता येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

## अनुसूची क

## वापर आकारावरील विद्युत शिल्क

(कलमे ३ आणि ६ पहा)

| अनु-क्रमांक | वीज देयकाचे प्रशुल्क प्रवर्ग | विविध प्रवर्गाच्या ग्राहकांना पुरविलेल्या विद्युत वापराबाबतचे प्रयोजन | दर |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | भाग क– निवासी. | महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या प्रशुल्क अनुसूचीनुसार,–<br>(एक) निवासी-दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती;<br>(दोन) निवासी-दारिद्र्य रेषेवरील व्यक्ती;<br>(तीन) संकुलांतर्गत दिवे, पाणी, उद्‌वाहन, मनोरंजन कक्ष किंवा समाज मंदिर, क्लब, व्यायामशाळा, तरण तलाव इत्यादी, यासारख्या निवासी सामाईक सुविधा;<br>(चार) निवासी-विद्यार्थी वसतिगृहे, नोकरदार पुरुष किंवा महिला वसतिगृहे;<br>(पाच) निवासी-निराश्रीत, शारीरिक किंवा मानसिक-दृष्ट्या विकल, वृद्धव्यक्ती यांच्याकरिता असलेली वसतिगृहे किंवा घरे, अनाथालये, बालसुधारगृहे, उपचारगृहे, धर्मशाळा;<br>(सहा) धार्मिक उपासना स्थान;<br>(सात) शारीरिकदृष्ट्या विकलांग असलेल्या व्यक्तींनी चालविलेली दूरध्वनी केंद्रे;<br>(आठ) " निवासी " सदराखाली प्रवर्गीकृत केलेल्या परंतु सामाजिक प्रयोजनासाठी असलेल्या परिवास्तू;<br>(नऊ) वरील प्रवर्गांतर्गत समाविष्ट नसलेल्या इतर कोणत्याही परिवास्तू. | राज्य शासन, एकतर भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी प्रभावाने, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, विनिर्दिष्ट करील अशा वापर आकाराच्या वीस टक्क्यांपेक्षा जास्त नसेल अशा दराने किंवा दरांनी. |
| २ | भाग ख– वाणिज्यिक. | महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या प्रशुल्क अनुसूचीनुसार,–<br>(एक) व्यावसायिक किंवा वाणिज्यिक आस्थापना-कॉर्पोरेट किंवा प्रशासकीय कार्यालये किंवा दुकाने किंवा व्यापारी मॉल्स (संकूल) किंवा शोरुम्स, बँका, एटीएम कक्ष, इत्यादी;<br>(दोन) व्यवसायामधील किंवा वाणिज्यिक आस्थापनांमधील दिवे, उद्‌वाहने, सुरक्षा, अग्निशमन, पाणी उद्धरण पंप यांसारख्या सामाईक सुविधा;<br>(तीन) सामूहिक केंद्रे-मंगल कार्यालये किंवा समाजमंदिर किंवा चर्चासत्र सभागृहे किंवा प्रदर्शन किंवा सभागृह किंवा टाऊन हॉल;<br>(चार) सार्वजनिक करमणूक– चित्रपटगृह, नाट्यगृह, कलागृह, मल्टीप्लेक्स, विश्राम किंवा मनोरंजन स्थळे, इत्यादी; | राज्य शासन, एकतर भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी प्रभावाने, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, विनिर्दिष्ट करील अशा वापर आकाराच्या तीस टक्क्यांपेक्षा जास्त नसेल अशा दराने किंवा दरांनी. |

अनुसूची क—चालू

| अनु-क्रमांक | वीज देयकाचे प्रशुल्क प्रवर्ग | विविध प्रवर्गाच्या ग्राहकांना पुरविलेल्या विजेच्या विनियोगाचे प्रयोजन | दर |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | | (पाच) आतिथ्य सेवा–हॉटेल्स किंवा अतिथीभवने, पर्यटन केंद्रे, उपाहारगृहे, आईस्क्रीमची दुकाने, कॉफीची दुकाने, फास्ट फूड केंद्रे किंवा स्टॉल इत्यादी; | |
| | | (सहा) संदेशवहन–दूरध्वनी कार्यालये, भ्रमणध्वनी टॉवर, सॅटेलाईट अँटेना, सार्वजनिक कॉल सेंटर किंवा बुथ, दूरदर्शन किंवा आकाशवाणी केंद्रे, इंटरनेट किंवा सायबर कॅफे, इत्यादी; | |
| | | (सात) सेवाभिमुख सेवा–ब्युटी पार्लर, केसकर्तनालये, सेवाकेंद्रे किंवा दुरुस्ती केंद्रे, इस्त्रीची दुकाने, गॅरेजेस, शिवणकामाची दुकाने, कॉल सेंटर्स; | |
| | | (आठ) संस्था–शैक्षणिक, प्रशिक्षण; | |
| | | (नऊ) आरोग्य सेवा–स्पोर्ट्स क्लब, आरोग्य क्लब, व्यायामशाळा, तरणतलाव, इत्यादी; | |
| | | (दहा) बांधकाम–इमारती, संरचना, मूलभूत सोई-सुविधा, रस्ते, विमानतळ, बोगदे, उपयुक्त सेवासुविधा नव्याने उभारणे किंवा त्यांचे नूतनीकरण करणे; | |
| | | (अकरा) स्मारक किंवा वारसा प्राप्त किंवा ऐतिहासिक इमारती, संरचना, स्थळे, इत्यादींची बाह्य रोषणाई, इत्यादी; | |
| | | (बारा) विज्ञान व संशोधन–संशोधन व विकास केंद्रे, प्रयोगशाळा, जलचर शेती, मत्स्यव्यवसाय, रेशीम उद्योग, पशुपैदास, रेतन ; | |
| | | (तेरा) जलचर शेती, रेशीम उद्योग, मत्स्यव्यवसाय; | |
| | | (चौदा) रुग्णालये, चिकित्सालये, दवाखाने, पॅथॉलॉजिकल प्रयोगशाळा किंवा रोगनिदान केंद्रे किंवा क्ष-किरण केंद्रे, इत्यादी; | |
| | | (पंधरा) माहिती व तंत्रज्ञान (आय टी)–उद्योग प्रवर्गांतर्गत मान्यता नसलेली आणि शासनाने तसा दर्जा न दिलेली सॉफ्टवेअर विकास, माहिती संस्करण केंद्र, इत्यादी; | |
| | | (सोळा) उपयोगिता सेवा म्हणून वीज देयक भरण्यासह ग्राहकाने भाड्याने किंवा भाडेपट्ट्याने घेतलेल्या परिवास्तू; | |
| | | (सतरा) " वाणिज्यिक " सदराखाली प्रवर्गीकृत केलेल्या परंतु सामाजिक प्रयोजनासाठी असलेल्या आस्थापना; | |
| | | (अठरा) वरील प्रवर्गांतर्गत समाविष्ट नसलेली इतर कोणतीही आस्थापना. | |

अनुसूची क—चालू

| अनु-क्रमांक | वीज देयकाचे प्रशुल्क प्रवर्ग | विविध प्रवर्गाच्या ग्राहकांना पुरविलेल्या विजेच्या विनियोगाचे प्रयोजन | दर |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| ३ | भाग ग–<br>कृषि | महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या प्रशुल्क अनुसूचीनुसार,–<br>(एक) पाणी उद्धरण पंप (पंपिंग);<br>(दोन) कुक्कुटपालन;<br>(तीन) हायटेक हरितगृहे, ऊति संवर्धन, अळंबी शेती, इत्यादी;<br>(चार) पुष्पसंवर्धन, उद्यानविद्या, रोपवाटिका, रोपमळे;<br>(पाच) तेलघाणा, पिठाची गिरणी, इत्यादी वगळून कृषिविषयक प्रक्रिया व स्वतःच्या वापरासाठी असलेले गुऱ्हाळ, वैरण कापणी यंत्र, इत्यादी;<br>(सहा) शीतगृहे, प्री-कुलींग;<br>(सात) " कृषि " सदराखाली प्रवर्गीकृत केलेला परंतु सामाजिक प्रयोजनासाठी असलेला उद्योग;<br>(आठ) वरील प्रवर्गांतर्गत समाविष्ट नसलेला इतर कोणताही कृषि उद्योग. | राज्य शासन, एकतर भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी प्रभावाने, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, विनिर्दिष्ट करील अशा वापर आकाराच्या तीस टक्क्यांपेक्षा जास्त नसेल अशा दराने किंवा दरांनी. |
देवीदास टेलीफोन एक्सचेंज जवळ,
बोरीवली (पश्चिम), मुंबई -४०० १०३

विषय :- विद्युत शुल्क परतावा मंजुरीबाबत...

संदर्भ :- विद्युत शुल्क सूट व परतावा समितीच्या दि. १५.९.२०१७ च्या बैठकीचे इतिवृत्त

विद्युत शुल्क परतावा समितीची दिनांक १५.९.२०१७ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर समितीच्या बैठकीमध्ये पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात आले :-

१) विदर्भ व मराठवाडा विभागातील औद्योगिक उपक्रमांकडून वापरण्यात येत असलेल्या जागेच्या बाबतीत त्या ठिकाणी वापरलेल्या वीजेच्या वापरावरील विद्युत शुल्क भरण्यातून अधिसूचना क्र.: इएलडी-२०१४/प्र.क्र.२१३/ऊर्जा-१, दि.१४.०७.२०१४ अन्वये सूट देण्यात आलेली आहे. सदरची सूट दि. ३१.३.२०१९ पर्यंत अनुज्ञेय आहे. त्यामुळे विदर्भ व मराठवाडा विभागातील औद्योगिक उपक्रमाना असे प्रकल्प ज्या तारखेपासून अस्तित्वात येतील त्या तारखेपासून विद्युत शुल्क माफी अनुज्ञेय करण्यात यावी तसेच याबाबतची कार्यवाही महावितरण कंपनीने परस्पर करावी.

२) समितीसमोर येणारी प्रकरणे ही उद्योगास विविध औद्योगिक प्रोत्साहन योजना अंतर्गत उद्भवणारी परतावा व सूट संदर्भात आहेत. चुकीच्या वर्गवारीमुळे विद्युत शुल्क व वीज दरातील तफावत देण्याबाबतची प्रकरणे वीज वितरण कंपनीने अधिनियमाच्या चौकटीत अनुज्ञेय करण्यात यावीत. तसेच अशा प्रकारची प्रकरणे समितीसमोर सादर करण्यात येऊ नयेत.

३) उद्योग विभागाच्या व इतर विभागाच्या विविध प्रोत्साहन योजना अन्वये तसेच धोरणातर्गत विशिष्ट कालावधी करीता विद्युत शुल्कात सूट देण्यात येते. ज्या योजने अंतर्गत व कालावधी करीता विद्युत शुल्कात सूट देण्यात येते, यात स्पष्टता येण्यासाठी विद्युत शुल्क सूट देण्यात येत असणाऱ्या व यापुढे देण्यात येणाऱ्या प्रत्येक ग्राहकांच्या देयकावर सदर सूट ज्या योजने अंतर्गत अनुज्ञेय आहे त्या योजनेचे Abbreviation व विद्युत शुल्क देय असणारा कालावधी देयकामध्ये नमूद करण्यात यावा.

२. उपरोक्त निर्णयानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

(प्र.पुं.बडगेरी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई-३२.
२) मुख्य विद्युत निरीक्षक, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, तिसरा मजला, प्रशासकीय इमारत, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर (पू), मुंबई -७१
३) निवड नस्ती- ऊर्जा -१

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन उपक्रम)
सीआयएन : यु४०१०९एमएच२००५एसजीसी१५३६४५
दुरध्वनी क्र. २६४७४७५३ (वै)/२६४७४२११ (का)
फॅक्स क्र. २६४७२३६६
संकेतस्थळ: www.mahadiscom.in
वाणिज्य विभाग, प्लॉट क्र. जी-९, प्रकाशगड
प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
ई - मेल : cecomm@mahadiscom.in

क्र. पी-कॉम/लेखा/वि.शु. सूट व परतावा/ 011167 दिनांक : 17 MAY 2018

प्रति,
सर्व अधिक्षक अभियंता,
महावितरण,
सं. व सु. मंडळ व नोडल कार्यालय.

विषय: विद्युत शुल्क सूट व परतावा बाबत मार्गदर्शक सुचना.

संदर्भ:
१) वाणिज्य परिपत्रक क्र.१०१ दि.०९.०६.२००९.
२) पी-कॉम/लेखा/वि.शु.माफी/२२५५०, दि.०८.०८.२०१३.
३) शासन निर्णय क्र.साप्रयो-२०१४/प्र.क्र.३/ऊद्योग-८ दि.०६.०६.२०१४.
४) वाणिज्य परिपत्रक क्र.१९६ दि.०५.०७.२०१४.
५) वाणिज्य परिपत्रक क्र.२४१, दि.१८.०५.२०१५.
६) शासन निर्णय क्र.इएलडी-२०१३/प्र.क्र.७९/भाग-१/ऊर्जा-१, दि.०८.०७.२०१६.
७) महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम -१९५८.
८) महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम -२०१६ दि.०८.०८.२०१६.
९) वाणिज्य परिपत्रक क्र.२६८ दि.२७.०९.२०१६.
१०) शासन पत्र क्र.इएलडी-२०१७/प्र.क्र.२३९/ऊर्जा-१, दि.२८.१२.२०१७.

शासन निर्णय क्र.इएलडी-२०१३/प्र.क्र.७९/भाग-१/ऊर्जा-१, दि.०८.०७.२०१६ अन्वये वाणिज्य परिपत्रक क्र.२६८ दि.२७.०९.२०१६ नुसार विद्युत शुल्क परतावा प्रकरणांसंबंधी निर्णय घेण्यासाठी नवीन कार्यपध्दती विहीत करण्यात आली होती. त्यानुसार वि.शु. परतावा प्रकरणे जलद गतीने हाताळली जावीत याकरीता शासन स्तरावर समिती गठीत करण्यात आली असून त्यानुसार महावितरणतर्फे कार्यवाही चालू आहे.

दि.१५.०९.२०१७ रोजी मा. प्रधान सचिव (ऊर्जा) यांच्या अध्यक्षतेखाली विद्युत शुल्क परताव्याबाबतची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये चुकीच्या वर्गवारीमुळे विद्युत शुल्क व वीज दरातील तफावत याबाबतची प्रकरणे शासनाने गठीत केलेल्या समितीच्या मंजुरीसाठी सादर करण्यात आली होती असे निदर्शनास आले. त्यानुसार दि.१५.०९.२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये विद्युत शुल्क परतावासंबंधीच्या प्रकरणांबाबत शासन पत्र क्र.इएलडी-२०१७/प्र.क्र.२३९/ऊर्जा-१, दि.२८.१२.२०१७ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला असून त्यानुसार मंडळ स्तरावर कार्यवाही करण्याबाबत मार्गदर्शक सुचना देण्यात येत आहेत.

- विदर्भ मराठवाडा विभागातील सर्व उद्योग घटकांना विद्युत शुल्क भरण्यातून शासन अधिसुचना दि.०७.०७.२००४, दि.२६.०५.२००९ व शासन निर्णय क्र.साप्रयो-२०१४/प्र.क्र.३/ऊद्योग-८ दि.०६.०६.२०१४ अन्वये दि.०१.०४.२००४ पासून दि.३१.०३.२०१९ पर्यंत सुट देण्यात आलेली असल्यामुळे विदर्भ व मराठवाडा विभागातील औद्योगिक उपक्रमांना चुकीने विद्युत शुल्काची आकारणी झाली असल्यास सदर विद्युत शुल्क माफी व परतावा बाबतची कार्यवाही महावितरण कंपनीने परस्पर करावी. तसेच विदर्भ व मराठवाडा विभागातील औद्योगिक ग्राहकांचे विद्युत शुल्क परताव्याचे प्रस्ताव समितीपुढे मंजुरीसाठी सादर करण्यात येऊ नये अशा सुचना शासनातर्फे महावितरण कंपनीस देण्यात आल्या आहेत.
- चुकीच्या वर्गवारीमुळे विद्युत शुल्क व वीज दरातील तफावतीमुळे आकारण्यात आलेले विद्युत शुल्क परतावा करण्याबाबतची प्रकरणे वीज वितरण कंपनीने अधिनियमाच्या चौकटीत अनुज्ञेय करण्यात यावीत. अशा प्रकारची प्रकरणे समितीपुढे मंजुरी करीता सादर करण्यात येऊ नयेत अशा सूचना महावितरण कंपनीला देण्यात आल्या आहेत.
- शासनाने गठीत केलेल्या समितीसमोर ज्या उद्योगास विविध औद्योगिक प्रोत्साहन योजना अंतर्गत सुट व परतावा प्राप्त आहे, अशा उद्योग घटकांची विद्युत शुल्क परतावा प्रकरणे शासन निर्णय दि.०८.०७.२०१६ व वाणिज्य परिपत्रक क्र.२६८ दि.२७.०९.२०१६ मधील मार्गदर्शक सुचनेनुसार मंडळ स्तरावर लेखा परिक्षित करुन शासनाने गठीत केलेल्या समितीपुढे मंजुरीसाठी सादर करण्याबाबत कार्यवाही मंडलस्तरावर करण्यात यावी व रु.१० लाख रक्कमेची प्रकरणे प्रधान सचिवांच्या मंजुरीस सादर करण्यात येतात त्याच्या पूर्ण नस्तीची प्रत वाणिज्य विभागास दयावी.

Scanned with CamScanner

➢ शासनाच्या वरील निर्देशानुसार वरील प्रकाराची विद्युत शुल्क परतावा प्रकरणे लेखा परिक्षित करुन पुढील पडताळणी करीता ग्राहकाला कोणत्या परिस्थितीत चुकून विद्युत शुल्काची आकारणी करण्यात आली त्याच्या कारणासह प्रकरण मुख्य अभियंता (वाणिज्य) यांचेकडे सादर करण्यात यावेत व तद्नंतर त्यांच्या मंजुरीनुसार संगणकीय प्रणालीद्वारे ग्राहकाच्या खाती वर्ग करावे

➢ शासन धोरणानुसार विविध योजने मार्फत विद्युत ग्राहकांना विद्युत शुल्क माफी व सुट देण्यात येते. त्या योजनेचे Abbreviation व विद्युत शुल्कात सुट देय असणारा कालावधी खालीलप्रमाणे विद्युत देयकामध्ये नमूद करण्याकरीता नवीन कार्यपध्दती संगणकीय प्रणालीत विकसित करण्यासाठी माहिती व तंत्रज्ञान विभागास प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर कार्यपध्दती विकसित झाल्यानंतर क्षेत्रिय कार्यालयामार्फत ज्या ग्राहकांना विद्युत शुल्क भरण्यापासून सूट देण्यात येते. त्याबाबतची खालीलप्रमाणे विहित माहिती भरण्याबाबत सूचना देण्यात येत आहे.

प्रोत्साहन योजनांचा तपशिल

| अ. क्र. | प्रोत्साहन योजनेचे नाव | विद्युत शुल्क माफीचा एकूण ५/१०/१५ वर्षांचा कालावधी व दि. --- ते ---- | संक्षिप्त स्वरुप (Abbreviation) |
|---|---|---|---|
| १ | सामूहिक प्रोत्साहन योजना -२००७, २०१३ इत्यादी | वर्ष---<br>दि. --- ते ---- पर्यंत | सामूहिक प्रोत्साहन योजना धोरण (Public Incentive Scheme Policy) |
| २ | माहिती व तंत्रज्ञान धोरण -२०१५ | वर्ष---<br>दि. --- ते ---- पर्यंत | माहिती व तंत्रज्ञान धोरण -२०१५ (IT Policy) |
| ३ | पर्यटन धोरण-२०१६ अंतर्गत विद्युत शुल्क दरात सवलत | वर्ष---<br>दि. --- ते ---- पर्यंत | पर्यटन धोरण-२०१६ (GoM Tourism Policy) |
| ४ | महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम-२०१६ मधील तरतुदींनुसार विद्युत शुल्क माफी असलेले विद्युत ग्राहक (केंद्र, राज्य शासन व स्थानिक स्वराज्य संस्था) | अधिनियमान्वये | महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम-२०१६ (Maharashtra Electricity Duty Act-२०१६) |
| ५ | विदर्भ व मराठवाडा क्षेत्रातील औद्योगिक घटकांना विद्युत शुल्क माफी | दि.०१.०४.२००४ ते दि.३१.०३.२०१९ पर्यंत | विदर्भ व मराठवाडा क्षेत्रातील औद्योगिक घटकांना विद्युत शुल्क माफी सवलत शासन अधिसूचना दि.७.७.२००४ व दि.२६.५.२००९ अन्वये, शासन निर्णय दि.६.६.२०१४ अन्वये. |
| ६ | अपारंपारिक ऊर्जा धोरण-२०१५ | वर्ष---<br>दि. --- ते ---- पर्यंत | नवीन व नवीकरणीय ऊर्जा -धोरण (अपारंपरिक ऊर्जा स्त्रोत धोरण-२०१५) |

वर नमुद केलेल्या मार्गदर्शक सूचनांन्वये विद्युत शुल्क माफी व परताव्याबाबत मंडळ / नोडल युनीट स्तरावर त्वरित कार्यवाही करण्यात यावी.

सोबत: शासन पत्र दि. २८.१२.२०१७

मुख्य अभियंता (वाणिज्य)

**प्रत सविनय सादर:**

१) प्रधान सचिव (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, महावितरण, औरंगाबाद.
३) प्रादेशिक कार्यकारी संचालक, महावितरण, कोकण, पुणे, नागपूर.
४) संचालक (संचलन) / (वाणिज्य) / वित्त, महावितरण, प्रकाशगड, मुंबई.
५) उपसचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
६) मुख्य विद्युत निरिक्षक, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, ३ रा मजला, प्रशासकीय इमारत, रामकृष्ण चेंबुरकर मार्ग, चेंबुर (पूर्व), मुंबई-४०० ०७१.
७) कार्यकारी संचालक (वितरण-२)/(देयक व महसूल), महावितरण, प्रकाशगड, मुंबई.
८) कार्यकारी संचालक (माहिती व तंत्रज्ञान), महावितरण, प्रकाशगड, मुंबई.

**प्रत सस्नेह रवाना:**

१) सर्व मुख्य अभियंता, महावितरण, परिमंडळ कार्यालय.
२) मुख्य महाव्यवस्थापक (सांघिक लेखा), महावितरण.

D:\Water\Accrual\ED Exemption ... SE_Nodal Unit- ED Refund...docx

Scanned with CamScanner

**विदर्भ व मराठवाडा विभागातील औद्योगिक घटकांना विद्युत शुल्क माफी सवलतीचा कालावधी वाढविण्याबाबत..**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग**
**शासन निर्णय क्रमांक साप्रोयो-२०१८/प्र.क्र.२५२ /उद्योग-८**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: २८/०५/२०१९

वाचा-

१) शासन निर्णय क्रमांक : शासन निर्णय उ.ऊ. व का. विभाग, क्र. साप्रोयो- २०१४/ (प्र.क्र. ०३) उद्योग-८/दि. ०६.०६.२०१४

**शासन निर्णय-**

संदर्भाधीन शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग दिनांक ०६.०६.२०१४ अन्वये मराठवाडा व विदर्भ विभागातील सर्व उद्योगांना विद्युत शुल्क माफीची सवलत दिनांक ०१.०४.२०१४ ते ३१.०३.२०१९ पर्यंत देय करण्यात आली होती.

राज्याचा सर्वांगीन विकास होण्यासाठी मराठवाडा व विदर्भ विभागाचा औद्योगिक विकास होणे आवश्यक असून तेथील उद्योगांना स्पर्धात्मक युगात टिकुन राहण्याकरिता सक्षम करणे आवश्यक आहे.

सदर बाब विचारात घेऊन शासनाने असा निर्णय घेतला आहे की, विदर्भ व मराठवाडयातील सर्व उद्योग घटकांना दिनांक ०१.०४.२०१९ ते ३१.०३.२०२४ पर्यंत पाच वर्षाकरिता विद्युत शुल्क माफीची सवलत वाढविण्यात येत आहे. सदर निर्णयाच्या अनुषंगाने आवश्यक अधिसूचना ऊर्जा विभागाकडून निर्गमित करण्यात येईल.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अभिप्रायाप्रमाणे त्यांचे अनौपचारिक संदर्भ क्र. मंबैप्र २०१९/ प्र.क्र.६ च्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०५२९११४५४३६४१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( श्रध्दा कोचरेकर )**
**शासनाचे अवर सचिव**

**प्रत,**

१. सर्व अ.मु.स./प्र.स./सचिव मंत्रालयीन विभाग
२. विकास आयुक्त (उद्योग)

# अधिसूचना

उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - ०१ ऑगस्ट, २०१९

**महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम, २०१६.**

**क्र. साप्रोयो-२०१८/प्रक्र-१५३/ऊर्जा-१.** - ज्याअर्थी, शासन अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक. साप्रोयो-२०१४/प्रक्र ५/ऊर्जा-१, दिनांक १४ जुलै २०१४ अन्वये महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम, १९५८ (१९५८ चा ४०) याच्या कलम ५ क द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासनाने राज्यात विदर्भ व मराठवाडा विभागातील औद्योगिक उपक्रमांकडून वापरण्यात येत असलेल्या जागेच्या बाबतीत त्या ठिकाणी वापरलेल्या विजेवर पाच वर्षासाठी महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम, १९५८ (१९५८ चा ४०) अधिनियमाच्या अनुसूचीतील भाग "च" आणि भाग "छ" च्या खंड (ख) खाली देय असलेले संपूर्ण वीज शुल्क भरण्यापासून दिनांक १ एप्रिल, २०१४ ते दिनांक ३१ मार्च, २०१९ पर्यंत सूट दिली आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक : साप्रोयो-२०१८/प्रक्र २५२/उद्योग-८, दि.२८ मे २०१९ द्वारे विदर्भ व मराठवाडा विभागातील औद्योगिक घटकांना विद्युत शुल्क माफी सवलतीचा कालावधी वाढविला आहे ;

आणि ज्याअर्थी, वीज शुल्कातून सूट देण्याचा पाच वर्षाचा उक्त सवलतीचा कालावधी सार्वजनिक हितास्तव वाढविणे आवश्यक आहे, अशी महाराष्ट्र शासनाची खात्री पटली आहे ;

आता त्याअर्थी, महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम, २०१६ (२०१६ चा २६) (यानंतर ज्याचा उल्लेख "सदर अधिनियम" असा करण्यात येईल.) च्या कलम ४ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे, दिनांक ३१ मार्च २०१९ रोजी किंवा त्या अगोदर वस्तूंच्या निर्मितीस किंवा उत्पादनास सुरुवात केली आहे अशा सध्या अस्तित्वात असलेल्या कोणत्याही औद्योगिक उपक्रमांच्या बाबतीत आणि दिनांक १ एप्रिल, २०१९ रोजी किंवा त्यानंतर वस्तूंच्या निर्मितीस किंवा उत्पादनास प्रथम सुरुवात केली असेल अशा कोणत्याही नवीन औद्योगिक उपक्रमांच्या बाबतीत वस्तूंच्या निर्मितीस किंवा

उत्पादनास सुरुवात केल्याच्या दिनांकापासून राज्यातील विदर्भ व मराठवाडा विभागातील बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, औरंगाबाद, जालना, परभणी, बीड, नांदेड, उस्मानाबाद, लातूर, गडचिरोली व हिंगोली या जिल्हयातील औद्योगिक उपक्रमांकडून वापरण्यात येत असलेल्या जागेच्या बाबतीत त्या ठिकाणी वापरलेल्या विजेवर पाच वर्षासाठी सदर अधिनियमासोबत जोडलेल्या अनुसूची “क” मधील भाग “च” आणि अनुसूची “ख” मधील अनुक्रमांक (एक) मध्ये दर्शविल्यानुसार स्ववापरासाठी स्वनिर्मित वीज खाली देय असलेले संपूर्ण वीज शुल्क भरण्यापासून दिनांक १ एप्रिल, २०१९ ते दिनांक ३१ मार्च, २०२४ पर्यंत सूट देत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे
आदेशानुसार व नावाने,

**(प्र. पुं. बडगेरी)**
शासनाचे उप सचिव

## NOTIFICATION

Industries, Energy and Labour Department,
Mantralaya, Madam Cama Marg,
Hutatma Rajguru Chowk,
Mumbai – 400 032.
Date : 01st August, 2019

Maharashtra Electricity Duty Act, 2016.

No. PSI-2018/CR-153/Energy-1. - Whereas, by the Government Notification, Industries, Energy and Labour Department, No.PSI-2014/ CR 5/Energy-1, dated the 14th July 2014, issued in exercise of the powers conferred by section 5A of the Maharashtra Electricity Duty Act, 1958 (XL of 1958), the Government of Maharashtra has exempted the consumption of energy in respect of the premises used for industrial undertakings in Vidarbha and Marathwada regions of the State of Maharashtra from the payment of whole of the electricity duty payable under Part 'F' and clause (b) of Part 'G' of the Schedule appended to the the Maharashtra Electricity Duty Act, 1958 (XL of 1958) for a period of five years with effect from the 1st April 2014 to 31st March 2019;

And whereas the Government of Maharashtra has, by the Government Resolution, Industries, Energy and Labour Department, No. PSI-2018/CR-252/Ind-8, dated the 28th May 2019 has extended the period of concession for electricity duty exemption to industrial undertakings in Vidarbha and Marathwada regions ;

And whereas, the Government of Maharashtra considers it necessary, in the public interest, to extend the period of said concession for electricity duty exemption for further period of five years ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by section 4 of the Maharashtra Electricity Duty Act, 2016 (XXVI of 2016) (hereinafter referred to as "the said Act"), the Government of Maharashtra hereby exempts the consumption of energy in respect of any existing industrial undertaking which has begun to manufacture or produce articles on or before 31st March 2019 and in respect of any new industrial undertaking which begins to manufacture or produce articles for the first time on or after 1st of April, 2019 from the date on which such industrial undertaking begins to manufacture or produce article in the districts of Buldhana, Akola, Vasim, Amravati, Yavatmal, Wardha, Nagpur, Bhandara,

Gondiya, Chandrapur, Aurangabad, Jalna, Parbhani, Beed, Nanded, Usmanabad, Latur, Gadchiroli and Hingoli in Vidarbha and Marathwada regions of the State of Maharashtra from the payment of whole of the electricity duty payable under Part F in Schedule A and Captive Power for the purpose of self use as indicated in clause (i) of Schedule B appended to the said Act for a period of five years with effect from the 1st April 2019 to 31st March 2024.

By order and in the name of
the Governor of Maharashtra,

**( P. P. BADGERI )**
Deputy Secretary to Government

**महावितरण**

(महाराष्ट्र शासन उपक्रम)
सीआयएन : यु४०१०९एमएच२००५एसजीसी१५३६४५

दुरध्वनी क्र. २६४७४७५३ (पी)/२६४७४२११ (का)
फॅक्स क्र. २६४७२३६६
संकेतस्थळ : www.mahadiscom.in

वाणिज्य विभाग, प्लॉट क्र. जी-९, प्रकाशगड
प्रो. अनंत काणेकर मार्ग, बांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
ई - मेल : cecommhq@gmail.com

क्र.मु.अ.(वा)/वि. शु. माफी/ No 1 0 4 9 3 दिनांक : 28 APR 2022

प्रति,
अधिक्षक अभियंता,
महावितरण, सं. व सु. मंडळ कार्यालय,
औरंगाबाद शहर / औरंगाबाद ग्रामीण / बीड / लातूर / उस्मानाबाद / नांदेड /
परभणी / हिंगोली / अकोला / बुलढाणा / वाशिम / अमरावती / यवतमाळ /
चंद्रपूर / गडचिरोली / भंडारा / गोंदिया / नागपूर ग्रामीण / नागपूर शहर / वर्धा.

**विषय: विदर्भ व मराठवाडा क्षेत्रामध्ये औद्योगिक ग्राहकांना देण्यात येणाऱ्या विद्युत शुल्क माफीबाबत.**
- निर्मिती किंवा उत्पादन करणाऱ्या (Manufacturing Unit) औद्योगिक उपक्रमांचा/ग्राहकांचा ड्युटी कोड (Duty Code) विद्युत निरीक्षक यांनी प्रमाणित केल्याप्रमाणे क्षेत्रीय कार्यालयामार्फत बदल करणेबाबत.

संदर्भ:
१) शासन निर्णय क्र.साप्रयो-२०१८/प्र.क्र.२५२/उद्योग-८ दि.२८/०५/२०१९
२) शासन अधिसुचना क्र.साप्रोयो-२०१८/प्र.क्र.१५३/ऊर्जा-१ दि.०१/०८/२०१९
३) कार्यालयीन टिप्पणी दि.१९/०७/२०११.
४) मु.महाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान) यांची कार्यालयीन टिप्पणी दि.२३/०९/२०११
५) पत्र क्र.मुविनि/तांत्रिक/१५१/२०२२ दि.०८/०२/२०२२
६) दि.०९/०२/२०२२ रोजी व्ही.सी.द्वारे मुख्य विद्युत निरीक्षक यांच्यासोबत झालेली बैठक.
७) पत्र क्र.मुविनि/वीजकर शाखा/३ (४)/१७९/२०२०-२१ दि.०९/०२/२०२२
८) पत्र क्र.मुविनि/वीजकर शाखा/३ (४)/२२९/२०२०-२१ दि.१५/०२/२०२२

उपरोक्त विषयान्वये शासन अधिसुचना क्र.साप्रोयो-२०१८/प्र.क्र.१५३/ऊर्जा-१ दि.०१/०८/२०१९ नुसार औद्योगिक वर्गवारीतील फक्त निर्मिती (Manufacturing) व उत्पादन (Production) करणाऱ्या उद्योगांनाच विद्युत शुल्क माफी देय आहे व इतर औद्योगिक ग्राहकांना विद्युत शुल्काची आकारणी करणे क्रमप्राप्त आहे.

वरील शासन निर्णयाप्रमाणे यापूर्वी विद्युत शुल्क माफी बाबतची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर करण्यात येत होती परंतु पात्र घटकांना माफी न मिळाल्याची व परताव्याची प्रकरणे मुख्यालयाकडे येत होती. त्यामुळे विद्युत शुल्क माफी मधील विलंब टाळण्यासाठी सदर माफी महावितरणच्या बिलिंग संगणकीय प्रणाली मधून मुख्यालय स्तरावर देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्या अनुषंगाने विदर्भ व मराठवाडा विभागातील सर्व औद्योगिक ग्राहकांना माहे जुलै २०२१ पासून मुख्य कार्यालय स्तरावर (Centrally) संगणकीय प्रणालीद्वारे विद्युत शुल्क माफी देण्यात आली होती.

याबाबत असे निदर्शनास आले की, सदर विद्युत शुल्क माफी ही विदर्भ व मराठवाडा विभागातील औद्योगिक ग्राहकांना लागू करण्यात आली होती परंतु मा. आयोगाने निर्धारित केलेल्या औद्योगिक (Industrial Tariff) वर्गवारीमध्ये उत्पादन न करणाऱ्या घटकांचा अथवा केवळ उद्योगाचा दर्जा देण्यात आलेल्या औद्योगिक घटकांचा देखील समावेश असल्याने मोबाईल टॉवर्स व इतर औद्योगिक ग्राहकांनाही विद्युत शुल्क माफी लागू झाली आहे.

Scanned with CamScanner

विदर्भ व मराठवाडा क्षेत्रामध्ये ज्या औद्योगिक ग्राहकांना विद्युत शुल्कात सवलत नाही जसे की, फ्लोअर मिल, मोबाईल टॉवर्स, सॉमिल, लॉड्री अशा (प्रत्यक्ष उत्पादन न करणाऱ्या ग्राहकांव्यतिरिक्त प्रत्यक्ष उत्पादन करणाऱ्या) औद्योगिक वीजदर (Industrial Tariff ) लागू असलेल्या ग्राहकांना मुख्य कार्यालय स्तरावर (Centrally) संगणकीय प्रणालीद्वारे सरसकट माहे जुलै-२०२१ ते जानेवारी २०२२ च्या वीज वापरावर आधारित वीज देयकापर्यंत माफी देण्यात आली आहे अशा ग्राहकांची माफी करण्यात आलेली विद्युत शुल्काची रक्कम माहे फेब्रुवारी २०२२ च्या वीज देयकामधून वसूल करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

तसेच, सद्यस्थितीत विद्युत शुल्क माफीचा लाभ घेत असलेल्या ग्राहकांना व तदनंतर अर्ज करणाऱ्या ग्राहकांच्या व्यवसायाचा प्रकार हा मॅन्युफॅक्चरिंग ॲक्टिव्हिटी (उत्पादन) आहे किंवा नाही हे विद्युत निरीक्षक कार्यालय यांचेमार्फत प्रमाणित करणे आवश्यक आहे व त्याप्रमाणे ग्राहकांच्या ड्युटी कोड (Duty Code) मध्ये बदल करावा लागेल. अशा औद्योगिक वीजदर लागू असलेल्या ग्राहकांची मंडळनिहाय (Circle Wise) यादी ई-मेलद्वारे सोबत पाठविण्यात आली आहे. याबाबत संबंधित मंडळ कार्यालयाने यादीतील ग्राहकाचा व्यवसाय प्रकार (Type of Activity) त्यांच्या स्तरावर प्रत्यक्ष भेट देऊन तपासावी व सदर तपासलेली ग्राहकांची यादी व्यवसायाच्या (Manufacturing Activity) प्रकारासह आपल्या क्षेत्रातील विद्युत निरीक्षकास देऊन त्यांच्याकडून सदर यादीतील ग्राहकांना विद्युत शुल्क माफी देण्यात यावी अथवा कसे याबाबत ती यादी प्रमाणित करून घेण्यात यावी आणि विद्युत निरीक्षकांनी प्रमाणित केलेली यादी व त्यांनी प्रमाणित केलेल्या शेऱ्यानुसार आपल्या मंडळ कार्यालय स्तरावर विद्युत शुल्क माफीचा व विद्युत शुल्क लागू करायचा ड्युटी कोड (Duty Code) संगणक प्रणाली मध्ये फीड करावा व तसा अहवाल मुख्य कार्यालयास खालील तक्त्यामध्ये सादर करावा.

| अ. क्र. | ग्राहकाचे नाव | ग्राहक क्र. | विजेचा दर (Tariff) | वीज वापराचा प्रकार (Activity) | विद्युत शुल्क माफी लागू /लागू नाही | विद्युत निरीक्षक यांनी प्रमाणित केले आहे किंवा नाही | Duty Code मध्ये सुधारणा केली किंवा नाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

दि.०१/०५/२०२२ नंतर येणारी विद्युत शुल्क माफीची सर्वप्रकरणे विद्युत निरीक्षक कार्यालयामार्फत वीज वापर हा Manufacturing (उत्पादन घटक) असल्याबाबत प्रमाणित केल्यानंतरच Feed करण्यात यावी, याची दक्षता घेण्यात यावी.

सोबत: ग्राहकांची यादी ई-मेलद्वारे

२८/०४/२०२२

मुख्य अभियंता (वाणिज्य)

प्रत सस्नेह रवाना:

१) मुख्य अभियंता, महावितरण, सं. व सु. परिमंडळ कार्यालय,
अकोला / अमरावती / चंद्रपूर / गोंदिया / नागपूर / औरंगाबाद / लातूर / नांदेड.

२) मुख्य महाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान), महावितरण, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१.

प्रत माहितीकरिता रवाना:

- मुख्य विद्युत निरीक्षक, ३ रा मजला, चेंबूर, मुंबई- ४०० ०७१
- संबंधित ग्राहकाला विद्युत शुल्क माफी देण्यात यावी अथवा कसे हे प्रमाणित करणेबाबत आपल्या स्तरावर संबंधित जिल्हा विद्युत निरीक्षकांना निर्देशित करण्यात यावे ही विनंती.

Scanned with CamScanner

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन उपक्रम)
सीआयएन : यु४०१०९एमएच२००५एसजीसी१५३६४५
वाणिज्य विभाग, प्लॉट क्र. जी-९, प्रकाशगड, प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.
संकेतस्थळ : www.mahadiscom.in, ई - मेल : cecommho@gmail.com

क्र.मु.अ.(वा)/वि.शु.प्रस्ताव/ 010221 दिनांक: 6 APR 2023

प्रति,
**अधिक्षक अभियंता**
सर्व सं व सु मंडळ, महावितरण,
**मंडळ कार्यालय-औरंगाबाद (श.), औरंगाबाद (ग्रा.), जालना, लातूर, बीड, उस्मानाबाद, नांदेड, परभणी, हिंगोली, अकोला, बुलढाणा, वाशिम, अमरावती, यवतमाळ, नागपूर (श.), नागपूर (ग्रा.), वर्धा, गोंदिया, भंडारा, चंद्रपुर, गडचिरोली.**

**विषय:** विदर्भ व मराठवाडा विभागातील निर्मिती (Manufacturing) किंवा उत्पादन (Production) करणाऱ्या औद्योगिक ग्राहकांचा विद्युत शुल्क परतावा प्रस्ताव मुख्य कार्यालयास मंजुरीसाठी पाठविण्याबाबत मार्गदर्शक सूचना.

**संदर्भ:**
१. महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम-१९५८
२. वाणिज्य परिपत्रक क्र.१०१ दि.०९/०६/२००९
३. पी-कॉम/लेखा/वि.शु.माफी/२२५५०, दि.०८/०८/२०१३
४. वाणिज्य परिपत्रक क्र.१९६ दि.०५/०७/२०१४
५. वाणिज्य परिपत्रक क्र.२४१ दि.१८/०५/२०१५
६. शासन निर्णय क्र. साप्रयो-२०१४/प्र.क्र.३/उद्योग-८, दि.०६/०६/२०१६
७. शासन निर्णय क्र. ईएलडी-२०१३/प्र.क्र.७९/भाग-१/ऊर्जा-१, दि.०८/०७/२०१६
८. महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम-२०१६ दि.०८/०८/२०१६
९. वाणिज्य परिपत्रक क्र.२६८ दि.२७/०९/२०१६
१०. शासन निर्णय क्र. ईएलडी-२०१७/प्र.क्र.२३९/ऊर्जा-१, दि.२८/१२/२०१७
११. क्र.पी-कॉम/लेखा/वि.शु.सूट व परतावा/१११६७, दि.१७/०५/२०१८
१२. शासन अधिसूचना क्र.साप्रोयो-२०१८/प्र.क्र.१५३/ऊर्जा-१ दि.०१/०८/२०१९
१३. क्र.मु.अ.(वा)/वि.शु.माफी/१०४९३, दि.२८/०४/२०२२

वरील संदर्भ क्र.१२ च्या अधिसूचनेनुसार व तद्पुर्वी शासन अधिसूचना व शासन निर्णय क्र. साप्रयो-२०१४/प्र.क्र.३/उद्योग-८, दि.०७/०७/२००४, दि.२६/०५/२००९, दि.०६/०२/२०१४ व शासन निर्णय क्र. साप्रयो-२०१८/प्र.क्र.२५२/उद्योग-८, दि.२८/०५/२०१९ अन्वये दि.०१/०४/२००४ पासून दि.३१/०३/२०२४ पर्यंत विदर्भ-मराठवाडा विभागातील उद्योगांना खालीलप्रमाणे माफी देण्यात आली आहे.

*"महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम, २०१६ (२०१६ चा २६) (यानंतर ज्याचा उल्लेख "सदर अधिनियम" असा करण्यात येईल) च्या कलम ४ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासन याद्वारे दिनांक ३१ मार्च २०१९ रोजी किंवा त्या अगोदर वस्तूंच्या निर्मितीस (Manufacturing) किंवा उत्पादनास (Production) सुरुवात केली आहे अशा सध्या अस्तित्वात असलेल्या कोणत्याही औद्योगिक उपक्रमांच्या बाबतीत आणि दिनांक १ एप्रिल, २०१९ रोजी किंवा त्यानंतर वस्तूंच्या निर्मितीस किंवा उत्पादनास प्रथम सुरुवात केली असेल अशा कोणत्याही नवीन औद्योगिक उपक्रमांच्या बाबतीत वस्तूंच्या निर्मितीस किंवा उत्पादनास सुरुवात केल्याच्या दिनांकापासून राज्यातील विदर्भ व मराठवाडा विभागातील उत्पादन व निर्मिती करणाऱ्या औद्योगिक ग्राहकांना संपूर्ण वीज शुल्क भरण्यापासून दिनांक १ एप्रिल , २०१९ ते दिनांक ३१ मार्च, २०२४ पर्यंत सूट देण्यात आली आहे."*

जर ग्राहकांना विद्युत शुल्क माफी असताना सुध्दा विद्युत शुल्क आकारण्यात आला असेल तर अशा ग्राहकाच्या विद्युत शुल्क परताव्याबाबत वाणिज्य विभागातर्फे वेळोवेळी विद्युत शुल्क परताव्याबाबत मार्गदर्शक निर्देश देण्यात आलेले आहेत.

सदर विद्युत शुल्क माफी ही विदर्भ व मराठवाडा विभागातील औद्योगिक ग्राहकांना लागू करण्यात आली आहे. परंतु मा. आयोगाने निर्धारित केलेल्या औद्योगिक (Industrial Tariff) वर्गवारीमध्ये उत्पादन न करण्याऱ्या घटकांचा अथवा केवळ उद्योगाचा दर्जा देण्यात आलेल्या औद्योगिक घटकांचा देखील (औद्योगिक ग्राहक म्हणून उल्लेख करण्यात आला आहे) SSI/DIC समावेश आहे. परंतु त्या ग्राहकांना विद्युत शुल्क माफी देण्यात आलेली नाही त्यामुळे सदरील ग्राहकांना विद्युत शुल्काची आकारणी करणे क्रमप्राप्त आहे व त्याबाबत वाणिज्य विभागातर्फे पत्र क्र. मु.अ.(वा)/वि.शु.माफी/१०४९३, दि.२८/०४/२०२२ नुसार योग्य ते निर्देश / मार्गदर्शन यापुर्वीच करण्यात आले आहे.

मंडळ कार्यालयामार्फत मंजुरीसाठी सादर करण्यात आलेल्या विद्युत शुल्क परताव्याच्या प्रस्तावाची पडताळणी केली असता असे निदर्शनास आले आहे की, सदर प्रस्तावाची आपल्याकडून योग्य पडताळणी, लेखा परिक्षण केले जात नाही जसे की, आपल्या कार्यालयाकडून येणाऱ्या प्रस्तावामध्ये कागदपत्रांची कमतरता, अस्पष्ट कागदपत्रे, प्रस्तावाची छायांकित प्रत (झेरॉक्स) अशा स्वरुपात येत असतात. त्यामुळे या कार्यालयास सदरील प्रस्तावाबाबत असलेल्या त्रुटींचा निपटारा करण्यासाठी वेळोवेळी मंडळ कार्यालयास पाठपुरावा करावा लागतो व परिणामी विद्युत शुल्क परतावा प्रस्तावास मंजुरी देण्यासाठी विलंब होतो.

मंडळ कार्यालयातर्फे सादर करण्यात येणाऱ्या विद्युत शुल्क परताव्या प्रस्तावासोबत जोडलेली सर्व प्रमाणपत्रे व दाखले हे मुळ प्रतीचे स्कॅन केलेले असावेत व प्रत्येक ग्राहकाचा प्रस्ताव हा स्वतंत्रपणे पाठविण्यात यावा, कारण की एकत्र प्रस्ताव पाठविल्याने त्यामध्ये एखाद्या ग्राहकाच्या प्रस्तावामध्ये काही त्रुटी असतील तर त्याच्या कागदपत्रांची पुर्तता होईपर्यंत इतर पात्र (परिपूर्ण कागदपत्रे असलेले प्रस्ताव) ग्राहकांचे प्रस्ताव हे निकाली काढताना अडचणी निर्माण होत आहेत.

वरील बाब विचारात घेता, मंडळ कार्यालयातर्फे येणाऱ्या विद्युत शुल्क परतावा प्रस्तावामध्ये एकसूत्रीपणा आणण्यासाठी खालीलप्रमाणे नमुद करण्यात आलेले कागदपत्रे क्रमवारीने जोडून पाठविण्यात यावीत.

१) **ग्राहकाचा ऑनलाईन अर्ज (महावितरण कंपनी ED Refund Portal वरील)**
२) **रु. २०० च्या बॉंड पेपरवर क्षतीपुर्ती बंध (Indemnity bond) घेण्यात यावा. सदर बॉंड नोटरी असणे आवश्यक आहे.**
३) **ग्राहकाच्या विद्युत शुल्क परतावा अर्जातील कालावधीनुसार आवश्यक असलेली कागदपत्रे.**

| विघुत शुल्क परतावा कालावधी | आवश्यक कागदपत्रे |
|---|---|
| १ सप्टेंबर २०१५ पुर्वीचा | जिल्हा उद्योग केंद्र नोंदणी प्रमाणपत्र (DIC) अथवा लघुउद्योग (SSI) प्रमाणपत्र आणि उद्यम नोंदणी प्रमाणपत्र |
| १ सप्टेंबर २०१५ ते ३० जून २०२० पर्यंतचा | उद्योग आधार आणि उद्यम नोंदणी प्रमाणपत्र |
| १ जुलै २०२० नंतरचा | उद्यम नोंदणी प्रमाणपत्र |

४) **ग्राहकांचा उद्योग ज्या उपविभागांतर्गत आहे, त्या उपविभागातील लघुदाब वीज जोडणीसाठी उपविभागीय अधिकारी व उच्चदाब वीज जोडणीसाठी कार्यकारी अभियंता यांनी ग्राहक हा उत्पादन किंवा निर्मिती करत असलेची खात्री करुन तसा स्थळ पाहणी अहवाल देणे आवश्यक आहे.**
५) **ग्राहकाची विद्युत शुल्क परत करावयाच्या रक्कमेची ऑन लाईन B-८० ज्या कालावधीचा विद्युत शुल्क परतावा आहे त्या कालावधीची B-८० जोडण्यात यावी व ती लेखापरिक्षित केलेली असावी (मुळप्रत)**

विद्युत शुल्क परतावा सादर करताना काही ग्राहकांचा पुर्वीचा वापर किंवा सद्यस्थितीतील वापर हा औद्योगिक वापर निर्मिती (Manufacturing) / उत्पादन (Production) साटी नसल्याचे आढळून आले असल्याने अशाप्रकारची मंजुरी ग्राहकास मिळाल्याचे आढळल्यास त्या ग्राहकाच्या विद्युत बिलातून वसुली करण्याबाबतचे नाहरकत बंधपत्र / क्षतीपूर्ती बंधपत्र (Indemnity bond) घेण्यात येत आहे.

उत्पादन व निर्मिती करीत असलेल्या लघुदाब ग्राहकाचा विद्युत भार वाढल्याने सदर ग्राहक जर उच्चदाब ग्राहकामध्ये परावर्तीत होऊन ग्राहक क्रमांक बदलल्यास / न बदलल्यास व तद्नंतर देखील सदर ग्राहक उत्पादन व निर्मिती करीत असल्याची खातरजमा कार्यकारी अभियंता स्तरावर झाल्यानंतर, सदर ग्राहकास विद्युत शुल्क माफी व परताव्याकरीताची वरील निर्दिष्ट संपूर्ण प्रक्रिया पुन:श्च करण्याची आवश्यकता असणार नाही. तसेच ग्राहकाचे प्रथम वीज बिल विद्युत शुल्क माफीसहीत निर्गमित होईल हे सुनिश्चित करावे.

यापुढे अपूर्ण कागदपत्रे पाठवु नयेत पूर्ण कागदत्रांची पुर्तता केलेल्या ग्राहकांच्या प्रस्तावांनाच मंजुरी देण्यात येईल.

तसेच, विद्युत शुल्क परताव्याची प्रकरणे Hard Copy मध्ये पाठविण्यात येऊ नयेत. ती फक्त Soft Copy स्वरुपात स्वतंत्र प्रस्ताव मंजुरीसाटी मुळ प्रतिचे PDF Scan करुन cecommho@gmail.com या ईमेलवर पाठविण्यात यावीत व त्याची एकप्रत cecommhosded@yahoo.com या ईमेलवर सुध्दा पाठविण्यात यावी.

वरील निर्देशांची अंमलबजावणी अत्यंत काटेकारेपणे करण्यात यावी.

**सोबत:** वरीलप्रमाणे.

06/04/2023

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**
**महावितरण**

**प्रत माहितीकरीता सविनय सादर:**
मा. संचालक, वाणिज्य (प्रभारी), महावितरण, प्रकाशगड, मुंबई.

**प्रत सस्नेह सादर:**
मुख्य अभियंता, परिमंडळ कार्यालय, महावितरण,
औरंगाबाद / लातूर / नांदेड / अकोला / अमरावती / नागपूर / गोंदिया चंदपूर.

## तपास सूची

| अ. क्र. | तपशिल | तपासले (✓) |
|---|---|---|
| १ | ग्राहकाचा ऑनलाईन अर्ज (महावितरण कंपनीच्या ED refund portal वरील) | |
| २ | रु.२०० च्या बाँड पेपरवर क्षर्तीपुर्ती बंधपत्र (Indemnity bond) घेण्यात यावा. सदर बाँड नोटरी असणे आवश्यकआहे. | |
| ३ | ग्राहकाचा उद्योग आधार / उद्यम नोंदणी / जिल्हा उद्योग केंद्र (DIC) / लघुउद्योग (SSI) प्रमाणपत्र. | |
| ४ | उपविभागातील लघुदाब वीज जोडणीसाठी उपविभागीय अधिकारी व उच्चदाब वीज जोडणीसाठी कार्यकारी अभियंता यांनी ग्राहक हा उत्पादन किंवा निर्मिती करत असलेची खात्री करुन तसा स्थळ पाहणी अहवाल. | |
| ५ | ग्राहकाची विद्युत शुल्क परत करावयाच्या रक्कमेची ऑनलाईन B-८०. ज्या कालावधीचा विद्युत शुल्क परतावा आहे त्या कालावधीचीच B-८० (मुळ प्रत). | |

# **क्षतिपूर्ती बंधपत्र**

(रु.२०० च्या बाँडपेपरवर)

मी / आम्ही -------------------------------------------------------------------------------------------
ग्राहक क्र:--------------------------------पत्ता: ------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------------------------------
------------प्रतिज्ञापुर्वक जाहीर करतो की, वरील परिसरात सदरील ----------------------उद्योग चालवीत आहोत आणि त्यासाठी महावितरण कंपनी,------------------------------ मंडळाकडून ------------------------ ----- च्यामार्फत विजजोडणी घेतली असुन त्याद्वारे वरील ठिकाणी विजेचा वापर करीत आहोत.

पुढे असे जाहिर करण्यात येते की, आम्ही मुंबई विद्युत शुल्क अधिनियम २०१६ च्या अंतर्गत मंजूर असलेल्या कालावधीकरीता विद्युत शुल्क माफीसाठी पात्र आहोत व मी / आम्ही दिनांक ------------------- पासून ते दिनांक ------------------------- पर्यत च्या कालावधीसाठी विद्युत शुल्क परताव्याची रक्कम रु. ------------------------ (अक्षरी रु.------------------------------------------------------) एवढया रक्कमेची मागणी केलेली आहे.

मी/आम्ही असे प्रमाणीत करतो की आमचे ऊपक्रमात विद्युत शुल्क माफीसाठी शासनास अभिप्रेत असल्याप्रमाणे औद्योगिक उत्पादन होते त्यानुसार अर्जदार घटक हा सुट व परताव्यासाठी पात्र आहे.

यापुर्वी अशा प्रकारच्या विद्युत शुल्क परतावा आम्ही मागणी केलेली नव्हती किंवा त्याबाबतचा तशा प्रकारचा कुठलाही लाभ आम्ही वर नमुद केलेल्या वीज जोडणीसाठी या अगोदर घेतलेला नाही.

तसेच आम्ही सादर केलेली कागदपत्रे चुकीची वा अयोग्य आढळल्यास अथवा अनुज्ञेयता कालावधीत कोणत्याही कारणास्तव सुट अनुज्ञेय न ठरल्यास विद्युत शुल्क परताव्याचे आदेश रद्द करावेत व परताव्याची समायोजित केलेली रक्कम वसुल करण्यास आमची कोणतीही हरकत नाही. तसेच भविष्यात उत्पादन किंवा निर्मिती बंद झाल्यास अथवा काही बदल झाल्यास विद्युत शुल्क माफी बंद करण्यास मी आपल्या कार्यालयास स्वत:हून कळवेन.

**अधिकृत स्वाक्षरी/ शिक्का**

**स्थळ:**

**दिनांक:**

विदर्भ व मराठवाडा विभागातील औद्योगिक घटकांना विद्युत शुल्क माफी सवलतीचा कालावधी वाढविण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग**

**शासन निर्णय क्रमांक:- साप्रोयो- २०२४/प्र.क्र.१३९/उद्योग-८**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२

दिनांक:- ११ जुलै,२०२४

**वाचा:-**

१) शासन निर्णय, उ.ऊ. व का. विभाग, क्रमांक:-साप्रोयो- २०१८/प्र.क्र.२५२/उद्योग-८, दि. २८.०५.२०१९.

२) विकास आयुक्त (उद्योग),उद्योग संचालनालय,नवीन प्रशासकीय भवन,मुंबई यांचा दि.२६.०४.२०२४ रोजीचा प्रस्ताव.

**प्रस्तावना:-**

राज्याचा सर्वांगीण विकास होण्यासाठी, मराठवाडा व विदर्भ विभागाचा औद्योगिक विकास होणे आवश्यक आहे. यासाठी मराठवाडा व विदर्भ विभागातील उद्योगांना स्पर्धात्मक युगात टिकून राहण्याकरीता सक्षम करणे आवश्यक असल्याने विदर्भ,मराठवाडा क्षेत्रातील अस्तित्वातील तसेच नव्याने स्थापित होणाऱ्या सर्व उद्योगांना शासनाने विद्युत शुल्क माफीची सवलत होती. सदर विद्युत शुल्क माफीच्या कालावधीस शासनाने वेळोवेळी मुदतवाढ दिली आहे.दि.२८.०५.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या विद्युत शुल्क माफी सवलतीचा ५ वर्षाचा कालावधी दि.३१.०३.२०२४ रोजी संपुष्टात आलेला आहे. त्यामुळे सदर विद्युत शुल्क माफीस मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय**

शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,क्रमांक-साप्रोयो-२०१८/प्र.क्र.२५२/उद्योग-८, दि.२८.०५.२०१९ अन्वये मराठवाडा व विदर्भ विभागातील जिल्हयात अस्तित्वात असलेल्या व नव्याने स्थापित होणाऱ्या सर्व उद्योगांना अनुज्ञेय करण्यात आलेली विद्युत शुल्क माफीची सवलत दि.३१.०३.२०२४ रोजी संपुष्टात आली आहे. विदर्भ व मराठवाडा या औद्योगिकदृष्ट्या अविकसित भागाचा औद्योगिक विकास व्हावा व या विभागातील उद्योग स्पर्धाक्षम व्हावेत यास्तव विदर्भ व मराठवाडयातील जिल्हयात अस्तित्वात असलेल्या व नव्याने स्थापित होणाऱ्या सर्व उद्योगांना दिली जाणारी विद्युत शुल्क माफीची सवलत दिनांक ०१.०४.२०२४ ते दिनांक ३१.०३.२०२९ पर्यंत ५ वर्षापर्यंत वाढविण्यात येत आहे.

२. सदर निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक ती अधिसूचना ऊर्जा विभागाकडून निर्गमित करण्यात येईल.

३. सदर शासन निर्णय मा.मंत्रीमंडळाच्या दि.०५.०७.२०२४ रोजी झालेल्या बैठकीत मा.मंत्रीमंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक क्रमांक २०२४०७१०१४२४२९५७१० असा आहे.सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( लक्ष्मीकांत ढोके )**
**सह सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव,
२) मा.अध्यक्ष,महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई
३) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई
४) मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधान परिषद,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई
५) मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन,मंत्रालय,मुंबई
६) मा. मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
७) मा.उप मुख्यमंत्री तथा मंत्री (गृह व विधी) यांचे सचिव,मंत्रालय,मुंबई
८) मा.उप मुख्यमंत्री तथा मंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
९) मा. मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१०) सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव
११) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) अपर मुख्य सचिव (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा,कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई
१३) प्रधान सचिव (उद्योग), उद्योग, ऊर्जा,कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई
१५) विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय,मुंबई
१६) सर्व जिल्हाधिकारी
१७) सर्व विभागीय आयुक्त
१८) अतिरिक्त उद्योग संचालक, उद्योग संचालनालय,मुंबई
१९) सर्व सह संचालक, उद्योग संचालनालय,मुंबई
२०) सर्व महाव्यवस्थापक,जिल्हा उद्योग केंद्र,उद्योग संचालनालय,मुंबई
२१) सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग
२२) निवड नस्ती (उद्योग-८)

## INDUSTRIES, ENERGY, LABOUR AND MINING DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 30th September 2024.

*NOTIFICATION*

Maharashtra Electricity Duty Act, 2016.

No. PSI-2024/C.R.-141/Energy-1.— Whereas, by the Government Notification, Industries, Energy and Labour Department, No.PSl-2018/C.R.- 153/Energy-l, dated the 1th August 2019, issued in exercise of the powers conferred by section 4 of the Maharashtra Electricity Duty Act, 2016 (XXVI of 2016), the Government of Maharashtra has exempted the consumption of energy in respect of any existing industrial undertaking which has begun to manufacture or produce articles on or before 31st March 2019 and in respect of any new industrial undertaking which begins to manufacture or produce articles for the first time on or after 1st of April 2019 from the date on which such industrial undertaking begins to manufacture or produce article in the districts of Buldhana, Akola, Vasim, Amravati, Yavatmal, Wardha, Nagpur, Bhandara, Gondiya, Chandrapur, Aurangabad, Jalna, Parbhani, Beed, Nanded, Usmanabad, Latur, Gadchiroli and Hingoli in Vidarbha and Marathwada regions of the State of Maharashtra from the payment of whole of the electricity duty payable under Part F in Schedule A and Captive Power for the purpose of self use as indicated in clause (i) of Schedule B appended to the said Act for a period of five years with effect from the 1st April 2019 to 31st March 2024;

And whereas the Government of Maharashtra has, by the Government Resolution, Industries, Energy, Labour and Mining Department, No. PSI- 2024/C.R.-139/Ind-8, dated the 11th July 2024 has extended the period of concession for electricity duty exemption to industrial undertakings in Vidarbha and Marathwada regions ;

And whereas, the Government of Maharashtra considers it necessary, in the public interest, to extend the period of said concession for electricity duty exemption for further period of five years ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by section 4 of the Maharashtra Electricity Duty Act 2016 (XXVI of 2016) (hereinafter referred to as “the said Act”), the Government of Maharashtra hereby exempts the consumption of energy in respect of any existing industrial undertaking which has begun to manufacture or produce articles on or before 31st March 2024 and in respect of any new industrial undertaking which begins to manufacture or produce articles for the first time on or any day after 1st of April 2024 from the date on which such industrial undertaking begins to manufacture or produce article in the districts of Buldhana, Akola, Wasim, Amravati, Yavatmal, Wardha, Nagpur, Bhandara, Gondiya, Chandrapur, Chhatrapati Sambhajinagar, Jalna, Parbhani, Beed, Nanded, Dharashiv, Latur, Gadchiroli and Hingoli in Vidarbha and Marathwada regions of the State of Maharashtra from the payment of whole of the electricity duty payable under Part F in Schedule A and Captive Power for the purpose of self use as indicated in clause (i) of Schedule B appended to the said Act for a period of five years with effect from the 1st April 2024 to 31st March 2029 subject to the following conditions namely:-

**Conditions :-**

(1) Industrial units eligible for exemption from the payment of electricity duty, under the Package Scheme of Incentive- 2019 and the Government Resolution, Industries, Energy, Labour and Mining Department, No. PSI- 2024/C.R.-139/Ind-8, dated the 11th July 2024, can avail exemption only under one Government policy i.e. either under Package Scheme of Incentive- 2019 or Government Resolution, Industries, Energy, Labour and Mining Department, No. PSI-2024/C.R.-139/Ind-8, dated the 11th July 2024 in the same financial year;

(2) As per para 4.1 of the Package Scheme of Incentive-2019, the eligible Micro, Small and Medium Enterprises (MSME) and small industries are exempted from payment of electricity duty and such benefit of exemption is out of basket incentive. Therefore annual limit of exemption for the payment of electricity duty shall not be considered in respect of MSME and small industries;

(3) As per conditions Nos. (1) and (2), the Industries, Energy, Labour and Mining Department (Industries) shall ensure that the amount of exempted electricity duty allowed to the eligible industrial units other than MSME and small industries shall remain within the annual limit of incentive for that year;

(4) For investment and employment generation through industrial development in the State, Sector Specific Policies such as Electronic Policy, Aero-space and Defense Policy etc., as well as other schemes issued by the Government from time to time are implemented as per the procedure of Package Scheme of Incentive- 2019. In addition to the Package Scheme of Incentive-2019, eligible units in other Sector specific policies are also exempted from the payment of electricity duty and such exemption shall remain within the allowed limit of incentive for that year;

(5) The Industries, Energy, Labour and Mining Department (Industries) shall ensure that the amount of exempted electricity duty allowed to the eligible industrial units under the Package Scheme of Incentive-2019 and Sector Specific Policies issued by the Government other than MSME and small industries shall remain within the annual limit of incentive for that year.

By order and in the name of the Governor of Maharashtra

NARAYAN KARAD,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.